# महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ

# वार्षिक अहवाल : सन २०१७-२०१८

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशिल | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ स्थापना व कार्य | ०३-०५ |
| २ | संचालक मंडळ | ०६-०७ |
| ३ | व्यवस्थापन | ०८-०९ |
| ४ | वित्तीय स्थिती | १०-१२ |
| ५ | इतर विभाग | |
| | (अ) बाजार समिती विभाग | १३-१५ |
| | (ब) निर्यात विभाग | १६-२५ |
| | (क)प्रकल्प विभाग | २६-२७ |
| | (ड) अभियांत्रिकी विभाग | २८-३० |
| | (इ) संगणक विभाग | ३१-३२ |
| | (ई) जनसंपर्क व प्रसिध्दी विभाग | ३३-३७ |
| | (प) कृषि व्यापार विकास विभाग | ३८-४२ |
| | (फ) तळेगाव शेती विभाग | ४३-४३ |
| ६ | इतर प्रकल्प | |
| | १) जागतीक बँक सहाय्यीत - महाराष्ट्र कृषि स्पर्धाक्षम प्रकल्प (MACP) | ४४-५० |
| | २) आशियाई विकास बँक (ADB) सहाय्यीत - कृषि व्यापार विषयक पायाभूत सुविधा विकास गुंतवणूक कार्यक्रम (AIDIP) | ५१-५२ |

# १. महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे - स्थापना व कार्ये

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे ची स्थापना महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व नियमन) अधिनियम १९६३ मधील कलम ३९ (अ) अन्वये २३ मार्च १९८४ रोजी झाली. सन २०१७-२०१८ या वर्षामध्ये कृषि पणन मंडळाने ३४ वे वर्ष पूर्ण केले आहे व कृषि पणन मंडळाचा ३४ वर्षाचा कालावधी हा विविध क्षेत्रात यश संपादित करुन देणारा तसेच राज्यात कृषी पणन व्यवस्थेत अद्ययावतपणा बरोबरच सूसुत्रता आणि समन्वयता आणण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण ठरला आहे. अहवाल वर्षात कृषि पणन मंडळाने कृषी पणन व्यवस्थेत आधुनिकीकरण, सुधारणा आणण्याबरोबरच राज्यात कृषी पणन व्यवस्था मजबूत करण्यासाठी विविध प्रकल्प राबविणे, योजना राबविणे, नवीन कार्यक्रम आखणे तसेच शेतकरी आणि शेतक-यांच्या संस्थांच्या विकासासाठी नियोजनबध्द प्रयत्न केले आहेत. राज्यात कृषि मालाच्या निर्यातीसाठी निर्यात सुविधा केंद्रांची स्थापना करुन ही केंद्रे सक्षमरित्या चालविण्यासाठी प्रयत्न केले आहेत. याचप्रमाणे महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व नियमन) अधिनियम १९६३ मध्ये बदल करणे आणि बाजार समित्यांसाठी मॉडेल ॲक्ट मधील तरतूदी लागू करणेसाठी प्रयत्न केले आहेत.

**उद्दीष्ट्ये व प्रमुख कार्यक्रम :**

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व नियमन) अधिनियम १९६३ मधील कलम ३९ (ज) अन्वये कृषि पणन मंडळाची उद्दीष्टे खालीलप्रमाणे आहेत.

१. बाजार व बाजारक्षेत्रांच्या विकासासाठी बाजार समित्यांनी हाती घेतलेले कार्यक्रम राबवुन अशा बाजार समित्यांच्या कामामध्ये समन्वय राखणे.

२. कृषि उत्पन्न बाजारांच्या विकासासाठी राज्यस्तरीय नियोजनाचे काम हाती घेणे.

३. कृषि उत्पन्न पणन विकास निधीची व्यवस्था ठेवणे व त्याचे प्रशासन करणे.

४. बाजार समित्यांच्या कामकाजात सुधारणा घडवून आणण्यासाठी बाजार समित्यांना सरसकटपणे सल्ला देणे किंवा एखाद्या विशिष्ट बाजार समितीला सल्ला देणे.

५. बाजार समितीने हाती घेतलेल्या बांधकाम कार्यक्रमासंबंधातील आराखडे व अंदाज तयार करण्याच्या तिच्या कामावर पर्यवेक्षण करणे आणि त्याबाबत तिला मार्गदर्शन करणे.

६. कृषि उत्पन्नाच्या पणनशी संबंधित असलेल्या गोष्टींबाबत प्रचार व प्रसिध्दी करण्यासाठी आवश्यक ती व्यवस्था करणे.

७. या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी मंडळ निश्चित करील अशा अटींवर व शर्तीवर बाजार समित्यांना अर्थसहाय्य किंवा कर्ज देणे.

८. कृषि विषयक पणनच्या संबंधातील विषयांबाबत चर्चासत्रे, कार्यसत्रे व प्रदर्शने आयोजित करणे किंवा त्यांची व्यवस्था ठेवणे.

९. कृषि उत्पन्नाच्या पणन संबंधात सर्वसाधारण हिताच्या असतील अशा इतर गोष्टी करणे.

१०. या अधिनियमान्वये त्याच्याकडे विशेषरीत्या सोपविण्यात आले असेल असे इतर कोणतेही कार्य पार पाडणे.

११. राज्य शासन त्यांच्याकडे सोपवील अशी तत्सम स्वरुपाची इतर कार्ये पार पाडणे.

**अंमलबजावणीतील प्रमुख कार्यक्रम :**

१. विविध कृषी उत्पन्न बाजार समित्यांना बाजार व्यवस्था विकसित करणेकरिता नव-नवीन सुधारणाबाबत सल्ला देणे व त्यासाठी कर्ज उपलब्ध करुन देणे.

२. फळे भाजीपाला आणि फुले यांचे आयुष्य वाढविण्यासाठी सहकारी संस्थांना प्रशितीकरण करणे Valule Addition Centre, शितगृहांची उभारणी करण्यासाठी तंत्रज्ञान उपलब्धतेबरोबरच उभारणीस मार्गदर्शन करणे.

३. विविध फळे, फुले आणि भाजीपाल्याची रोपे / बियाणे / कंद यांची आयात करणे.

४. बाजार समित्यांची लिलाव प्रक्रीया व कार्यालयीन कामकाजाचे संगणकीकरण करणे.

५. कृषि पणन मंडळ, पणन संचालनालय व बाजार समित्यांच्या कामकाजासाठी संगणक प्रणाली विकसित करुन कार्यान्वीत करणे.

६. बाजार समित्यांचे पदाधिकारी / अधिकारी यांचेसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे.

७. राज्यामध्ये उच्च तंत्रज्ञानावर आधारित, कृषी आधारित प्रकल्प वाढविणे तसेच त्यामध्ये उत्पादीत मालाच्या विक्रीसाठी मदत व मार्गदर्शन करणे.

८. विविध प्रदर्शनात भाग घेणे तसेच प्रदर्शनांचे आयोजन करणे.

९. शेतमाल तारण योजना राबविणेसाठी बाजार समित्यांना सवलतीच्या दराने कर्ज देणे.

१०. शेतमाल निर्यातवृध्दी होण्यासाठी शेतकऱ्यांच्या मालाचे नमुने परदेशात पाठविणे, निर्यातीबाबतची माहिती शेतकरी आणि शेतकऱ्यांच्या संस्थांना देणे व त्यांच्या मालाची निर्यात करुन देणे.

११. प्रकल्प अहवाल तयार करणे.

१२. तळेगांव दाभाडे येथील शेतीवर आधुनिक शेतीचे प्रयोग राबविणे.

१३. व्ही. एच. टी प्रकल्पातील सोई सुविधांचा व्यावसायिक उपयोग शेतकरी, निर्यातदार यांना करुन देणे.

१४. राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांना केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांचा फायदा तसेच अनुदान मिळवून देण्यासाठी मदत आणि मार्गदर्शन करणे.

१५. बाजार समित्यांना राज्यातील तसेच परराज्यातील अभ्यास दौऱ्यांसाठी मार्गदर्शन करणे.

१६. “ कृषि पणन मित्र ” मासिकाचे प्रकाशन आणि वितरण करणे.

१७. ‘ उत्पादक ते ग्राहक ’ योजना वेगवेगळ्या शहरांमध्ये राबविणेकरिता संस्थांना प्रोत्साहीत करणे.

१८. प्रसिध्दी माध्यमांशी योग्य समन्वय ठेवून कृषि पणन मंडळाच्या विविध योजनांना प्रसिध्दी देवून त्यांची माहिती बाजार समिती, शेतकरी, शेतकऱ्यांच्या संस्था यांच्यापर्यंत पोहोचवून त्याचे फायदे शेतकऱ्यांना करुन देणे.

१९. राष्टीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेअंतर्गत माती परिक्षण, शेतकरी प्रशिक्षण तसेच सुगी पश्चात तंत्रज्ञानासंबंधात विविध चाचण्या घेणे.

२०. कृषि पणन मंडळातील अधिकाऱ्यांची / कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढविण्याचे दृष्टिने त्यांना प्रशिक्षित करणे.

२१. कृषि निर्यात क्षेत्र अंतर्गत निर्यात सुविधा केंद्रांची उभारणी करणे.

२२. हॉर्टिकल्चर ट्रेनिंग सेंटर मध्ये पूर्ण क्षमतेने प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करणे तसेच नव नविन पिकांबाबत प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे.

२३. उत्पादक ते ग्राहक कृषि माल विक्री योजना कार्यान्वीत करुन तिचा प्रचार आणि प्रसार करणे

२४. कृषि पणनाशी संबंधीत विषयावर माहिती पुस्तिका तयार करणे.

२५. राज्यातील बाजार समित्यांचा व्यवसाय विकास आराखडा तयार करणे.

२६. राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत कृषि विपणनाच्या सुविधा निर्माण करणे.

२७. नक्षलग्रस्त भागातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत सोयी सुविधांची उभारणी करणे.

२८. कृषि मालाचे ब्रॅण्ड विकसित करणे.

२९. राष्ट्रीय कृषी बाजार (E NAM) प्रकल्पात राज्यातील बाजार समित्यांचा समावेश करणे.

३०. कृषि उत्पन्न बाजार समित्यांसाठी कॉमन अकौंटिंग सिस्टिमचा वापर करणे.

३१. उत्पादक ते ग्राहक उपक्रमाअंतर्गत "शेतकरी आठवडे बाजार" योजनेची संपूर्ण राज्यात अंमलबजावणी करणे.

३२. शेतकरी उत्पादक कंपन्यांना सल्ला सेवा, मदत, मार्गदर्शन करणे तसेच शेतकरी उत्पादक कंपन्यांना शेतमाल विक्री व्यवस्थेसाठी मार्गदर्शन करणे, त्यांचे मजबूतीकरण करणे.

३३. आंतरराज्य व्यापार वृध्दीसाठी प्रयत्न करणे या अंतर्गत राज्यातील शेतीमाल शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या माध्यमातून इतर राज्यात विक्री करणे तसेच इतर राज्यातील शेतीमाल विना मध्यस्त आपल्या राज्यात विक्रीसाठी आणणे.

३४. निर्यातदार आणि शेतकरी / गट / कंपन्या यांचे सांगड घालून निर्यातीला प्रोत्साहन देणे, मार्गदर्शन करणे.

३५. निर्यातीस चालना देण्यासाठी "हॉर्टिकल्चर एक्सपोर्ट ट्रेनिंग प्रोग्राम" आयोजित करुन निर्यातदार तयार करणे.

३६. निआम - जयपूर, मॅनेज – हैद्राबाद, आय.आय. एफ.टी. – नवी दिल्ली, डी.एम.आय.,वैकुंठ मेहता नॅशनल इन्स्टीट्यूट ऑफ को-ऑप मॅनेजमेंट, आय.सी.एम., पुणे यांच्या मदतीने विविध प्रशिक्षण, कार्यक्रमाचे आयोजन करणे. तसेच त्यांचे मार्फत आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये कृषि उत्पन्न बाजार समित्या तसेच कृषि पणन मंडळाचे अधिकारी पाठविणे.

## २. संचालक मंडळ

| अ.क्र. | संचालकाचे नाव व पदनाम |
|---|---|
| १. | **मा.ना.श्री.सुभाष सुरेशचंद्र देशमुख**<br>मंत्री, सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई –३२. तथा<br>मा.अध्यक्ष महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ., पुणे |
| २. | **मा.ना.श्री.सदाशिव रामचंद्र खोत**<br>राज्यमंत्री, कृषि,फलोत्पादन व पणन .<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई – ३२ तथा<br>मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ.,पुणे. |
| ३. | **मा.श्री.दिलिपराव मोहिते,**<br>सभापती, महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ मर्या., पुणे तथा<br>मा.सदस्य, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे. |
| ४. | **मा.श्री.चंद्रकांत दळवी,** भा.प्र.से. (दि.२४/०४/२०१७ पर्यत)<br>**मा.डॉ.आनंद जोगदंड** (दि. २४/०४/२०१७ ते ०८/०५/२०१७ पर्यत)<br>**मा.डॉ.जे.डी पाटील,** भा.प्र.से (दि. ०८/०५/२०१७ ते ०६/०६/२०१७ )<br>**मा.श्री.चंद्रकांत दळवी,** भा.प्र.से. (दि.०६/०६/२०१७ ते २४/०७/२०१७ पर्यत)<br>**मा.श्री.विजय झाडे,** भा.प्र.से (दि. २४/०७/२०१७ पासून)<br>सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,<br>महाराष्ट्र राज्य, पुणे. |
| ५. | **मा.चिफ जनरल मॅनेजर,**<br>नाबार्ड प्रतिनिधी, पुणे. |
| ६. | **मा.श्री.विकास देशमुख,** भा.प्र.से. (दि.१५/०५/२०१७ पर्यत)<br>**मा.श्री.सुनिल केंद्रेकर,** (दि.१५/०५/२०१७ ते ३१/०८/२०१७ पर्यत)<br>**मा.श्री. सचिंद्र प्रताप सिंह,** भा.प्र.से (दि.३१/०८/२०१७ पासून<br>आयुक्त, (कृषि)<br>कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे. |
| ७. | **मा.श्री.भवेश कुमार जोशी,**<br>उपकृषि पणन सल्लागार,<br>प्रादेशिक कार्यालय, मुंबई. |
| ८. | **मा.ॲड.सुधिर दौलतचंद कोठारी,** (दि.०६/०६/२०१७ पर्यत)<br>**सभापती**, कृषि उत्पन्न बाजार समिती, हिंगणघाट, जि.वर्धा तथा<br>**मा.सदस्य**, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे.<br>**मा.श्री.मोहन उत्तमराव इंगळे,** (दि.०६/०६/२०१७ पासून)<br>सभापती, कृषि उत्पन्न बाजार समिती, धामणगाव, जि.अमरावती तथा<br>मा.सदस्य, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे. |
| ९. | **मा.श्री.तात्यासाहेब दगडू हुले,** (दि.०६/०६/२०१७ पर्यत)<br>सभापती, कृषि उत्पन्न बाजार समिती, पाटोदा, जि.बीड<br>मा.सदस्य, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे.<br>मा.श्री.नारायण बाजीराव पाटील (दि.०६/०६/२०१७ पासून) |

| अ.क्र. | संचालकाचे नाव व पदनाम |
|---|---|
| | सभापती, कृषि उत्पन्न बाजार समिती, दोंडाईचा, जि.धुळे<br>मा.सदस्य, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे. |
| १०. | **मा.भाऊसाहेब भगवान गायकवाड** (दि.०६/०६/२०१७ पासून)<br>सभापती, कृषि उत्पन्न बाजार समिती, आटपाडी,जि.सांगली<br>मा.सदस्य, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे. |
| ११. | **मा.श्री.रविंद्र नारायण घोडविंदे,** (दि.०६/०६/२०१७ पासून)<br>सभापती, कृषि उत्पन्न बाजार समिती, कल्याण,जि.ठाणे<br>मा.सदस्य, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे. |
| १२. | **मा.श्री.रूपचंद रामकृष्णजी कडू,** (दि.१८/०१/२०१८ पासून)<br>सभापती, कृषि उत्पन्न बाजार समिती, उमरेड, जि.नागपूर<br>मा.सदस्य, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे. |
| १३. | **मा.श्री.सुनिल पवार** (दि.१३/०६/२०१७ पर्यत)<br>**मा.डॉ.आनंद जोगदंड** (दि.१४/०६/२०१७ पासून)<br>पणन संचालक,महाराष्ट् राज्य,पुणे<br>मा.सदस्य, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे. |
| १४. | **मा.डॉ.के.झेड.तोष्णीवाल** (दि. १६/०६/२०१७ पर्यत)<br>**मा.श्री.सुनिल पवार** (दि.१६/०६/२०१७ पासुन)<br>कार्यकारी संचालक,<br>महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे<br>तथा सदस्य सचिव |

# ३. व्यवस्थापन

| क्र. | अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | कालावधी | विभाग |
|---|---|---|---|
| १. | डॉ.के.झेड. तोष्णीवाल (अतिरिक्त पदभार) | दि.१६/०६/२०१७ पर्यत | कार्यकारी संचालक |
| | श्री.सुनिल गो. पवार (प्रतिनियुक्ती) | दि. १६/०६/२०१७ पासून | |
| २. | श्री. मिलिंद आकरे (प्रतिनियुक्ती ) | दि.१८/०५/२०१७ पर्यत | सरव्यवस्थापक |
| | श्री.दिपक डी.शिंदे (प्रतिनियुक्ती ) | दि.१८/०५/२०१७ पासून | |
| ३. | डॉ. प्रशांत सोनवणे, उपसरव्यवस्थापक (प्रतिनियुक्ती) | दि.०३/०६/२०१७ पर्यत | बाजार समिती/बीडीपी / प्रशासन |
| ४. | श्री.डी.डी.देशमुख, सहाय्यक सरव्यवस्थापक (उपसरव्यवस्थापक-स्थापत्य) अतिरिक्त पदभार) | -- | अभियांत्रिकी |
| ५. | श्री. जितेंद्र व्ही. कोळंबे, उपसरव्यवस्थापक, (प्रतिनियुक्ती ) | -- | वित्त व लेखा |
| ६. | डॉ. बी. एन. पाटील, सहाय्यक सरव्यवस्थापक, | दि.२२/११/२०१७ पर्यत | कृषि व्यापार विकास व जनसंपर्क व प्रसिध्दी |
| | श्री.जे.जे.जाधव | दि.२२/११/२०१७ पासून | कृषि व्यापार विकास |
| ७. | श्री.एम.एल.लोखंडे, सहाय्यक सरव्यवस्थापक | -- | संगणक |
| ८. | श्री.डी.एम.साबळे, सहाय्यक सरव्यवस्थापक | -- | निर्यात सेल / व्ही. एच. टी. वाशी |
| ९. | श्री.एम.पी.पवार, सहाय्यक सरव्यवस्थापक | -- | बीडीपी/प्रकल्प |
| १०. | श्री. डी.एस पाटील, व्यवस्थापक | -- | प्रशासन |
| ११. | श्रीमती एस.ए.तांभाळे, विधी अधिकारी व्यवस्थापक, | -- | विधी अधिकारी जनसंपर्क व प्रसिध्दी |
| १२. | श्री.जयंत कोकणे, व्यवस्थापक, | -- | वित्त व लेखा |
| १३. | श्री.एस.पी.बाजारे, व्यवस्थापक | -- | रा.कृ.वि.यो.- अभियांत्रिकी |
| १४ | श्री.बी.जी.कातोरे, व्यवस्थापक | -- | बाजार समिती |
| १५. | श्री.ए.ए.औताडे, व्यवस्थापक | -- | शेतमाल तारण योजना (बा.स.) |
| १६. | श्री. के.एस. फटांगरे , व्यवस्थापक | -- | संगणक ( हार्डवेअर ) |
| १७ | श्री.व्ही.व्ही.जगदाळे, व्यवस्थापक | -- | संगणक (डेटाबेस ) |
| १८. | श्री.एस.डी.मेहेरकर, व्यवस्थापक (प्र)<br>श्री.जे.जे.जाधव, व्यवस्थापक (प्र) | दि.०८/०१/२०१८ पर्यंत<br>दि.०९/०१/२०१८ पासून | शेती (तळेगाव) |

## विभागीय उपसरव्यवस्थापक/ विभागीय सहायक सरव्यवस्थापक / विभागीय व्यवस्थापक

| क्र. | विभाग प्रमुखाचे नाव व पदनाम | कालावधी | विभाग |
|---|---|---|---|
| १. | डॉ. अशोक एस. गार्डी, उपसरव्यवस्थापक | -- | पुणे |
| २. | श्री.डी.डी.आहेर, उपसरव्यवस्थापक | -- | नाशिक |
| ३. | कु. शुभांगी सं. गोंड, उपसरव्यवस्थापक | -- | लातूर |
| ४. | श्री.एल.बी.मुंदडा, उपसरव्यवस्थापक | -- | अमरावती |
| ५. | श्री. सचिन भिमराव घोडके, उपसरव्यवस्थापक<br>श्री. एम.एस.गवळे (अतिरिक्त पदभार) | दि. ०५/०६/२०१७ पर्यत<br>दि. ०५/०६/२०१७ पासून | नागपूर |
| ६. | श्री. एम. एन. साळुंके पाटील, उपसरव्यवस्थापक | -- | औरंगाबाद |
| ७. | श्री. एम.के.अहिरे, उपसरव्यवस्थापक<br>डॉ.बी.एन.पाटील, उपसरव्यवस्थापक | दि. ०९/११/२०१७ पर्यत<br>दि. २९/११/२०१७ पासून | रत्नागिरी |
| ८. | श्री.ए.जे.पवार, व्यवस्थापक, (उपसरव्यवस्थापक अतिरिक्त पदभार) | -- | कोल्हापूर |
| ९. | श्री. सुरेंद्र एम. तांबे, उपसरव्यवस्थापक ( प्रशासकीय अधिकारी)<br>श्री. रामेंद्र जोशी (अतिरीक्त पदभार) | दि. १७/०७/२०१७ पर्यत<br>दि. १७/०७/२०१७ पासून | पदव्युत्तर कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, तळेगाव दाभाडे |

# ४. वित्तीय स्थिती

## उत्पन्नाची साधने -

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मधील कलम क्र. ३९ (ल) नुसार महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या उत्पन्नाची साधने ही कृषि उत्पन्न बाजार समित्यांकडून जमा होणारे वार्षिक अंशदान, कर्जावरील व्याज, गुंतवणूकीवरील व्याज, निर्यात सुविधा केंद्रे व इतर उत्पन्न ही आहेत.

सदरच्या प्राप्त होणाऱ्या निधीमधून कृषि पणन मंडळाच्या आस्थापना तसेच प्रशासकीय खर्च व इतर विकासात्मक कामांबाबतचा खर्च भागवून उर्वरीत रक्कम बाजार समित्यांना विकासात्मक कामांसाठी निधी म्हणून देण्याची तरतूद वरील कायदा कलम ३९ (ल)(३) मध्ये नमुद केली आहे. त्यानुसार दिनांक ३१/०३/२०१७ अखेर कृषि पणन मंडळास प्राप्त झालेले उत्पन्न व त्याचा विनियोग याबाबतची माहिती खालीलप्रमाणे;

### ताळेबंद – २०१७-२०१८

(रु. कोटीत)

| अ.क्र | देयता | रक्कम रु. | संपत्ती | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १ | मार्केटिंग फंड | ४२५.३६ | स्थावर मालमत्ता | १५३.४३ |
| २ | बँक ओव्हरड्राफ्ट | ०.०० | गुंतवणुक | २७५.९८ |
| ३ | चालु देयता | २९.९८ | बँकेतील शिल्लक | १६.९५ |
| ४ | अनुदान (अपेडा व इतर ) | ४९.०९ | अखेरच्या मालाचा साठा | ०.०१ |
| ५ | मार्केटिंग एक्सटेन्शन फंड | ७.३३ | बाजार समिती कर्ज येणे | ७६.४६ |
| ६ | कांदा निर्यात डेव्हलपमेंट एक्सटेंशन फंड | ४८.४७ | चालु देयता | ६८.७८ |
| ७ | आरवाय अनुदान.व्ही.के. | १.५५ | आयकर | ०.७० |
| ८ | तरतुद | ३०.५३ | | |
| | **एकुण** | **५९२.३१** | **एकुण** | **५९२.३१** |

### उत्पन्न व खर्च – २०१७-२०१८

(रु. कोटीत)

| अ.क्र. | खर्च | रक्कम रु. | उत्पन्न | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १ | आस्थापना खर्च | १३.१५ | बाजार समिती कर्जावरील व्याज | ९.८७ |
| २ | प्रशासकीय खर्च | ४.४८ | गुंतवणुकीवरील व्याज | १७.१५ |
| ३ | निर्यातवृध्दी | ०.०४ | प्रकल्प सल्ला विभाग | ०.०० |
| ४ | विकास व प्रकल्प | ०.०८ | निर्यात सुविधा केंद्रे उत्पन्न | २.४१ |
| ५ | घसारा | ५.८६ | कृषि पणन मित्र वर्गणी | ०.२९ |
| ६ | तरतुद | ७.३२ | इतर उत्पन्न | १.२१ |
| | **एकुण** | **३०.९३** | **एकुण** | **३०.९३** |

पणन मंडळाचा अतिरिक्त निधी शासकीय व शेड्युल्ड बँकेमध्ये केलेल्या गुंतवणुकीमुळे गुंतवणुकीवरील व्याजाचे उत्पन्न सरासरी ६.५० टक्के दराने मिळाले असून अहवाल वर्षातील भांडवली बाजारातील व्याजदर ५.५० टक्के ते ७.७५ टक्के विचारात घेता मिळालेले उत्पन्न निश्चित चांगले आहे.

**लेखे तपासणी –**

पणन मंडळाचे वैधानिक लेखा परिक्षण मार्च २०१५-२०१६ अखेर व अंतर्गत लेखापरिक्षण व कर लेखा परिक्षण मार्च २०१७ अखेर पूर्ण करण्यात आले आहे.

## सन २०१८-२०१९ अर्थसंकल्प - उत्पन्न

(रु.कोटीत)


| अ.क्र. | तपशील | रक्कम रु. | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | अंशदान | ४०.०० | ३६.८२ |
| २ | कर्ज वसुली | २७.०० | २४.८५ |
| ३ | कर्जावरील व्याज (बा.स. व इतर) | ९.०० | ८.२८ |
| ४ | गुंतवणुकीवरील व्याज | १६.०० | १४.७३ |
| ५ | मुदत ठेवीवरील कर्ज | ५.०० | ४.६० |
| ६ | निर्यात सुविधा केंद्र उत्पन्न | ५.६३ | ५.१८ |
| ७ | इतर उत्पन्न | ६.०१ | ५.५३ |
| | **एकुण** | **१०८.६४** | **१००.००** |

## सन २०१८-२०१९ अर्थसंकल्प – विनियोग


(रु. कोटीत)

| अ.क्र. | तपशील | रुपये | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | बाजार समिती कर्ज वाटप व अनदान वाटप | ६५.२० | ३६.१० |
| २ | आस्थापना, प्रशासकीय व इतर खर्च | २६.३२ | १४.५७ |
| ३ | मुदत ठेवींवरील कर्ज, घर बांधणी अग्रिम व इतर अग्रिम | ७.०० | ३.८८ |
| ४ | भांडवली खर्च (मुख्यालय, निर्यात सुविधा केंद्रे व इतर) | ७९.३२ | ४३.९२ |
| ५ | निर्यात प्रमोशन व विकास व प्रकल्प | २.७५ | १.५२ |
| | **एकुण** | **१८०.५९** | **१००.००** |

## सन २०१८-२०१९ अर्थसंकल्प – उत्पन्न




## सन २०१८-२०१९ अर्थसंकल्प – विनियोग



# ५. इतर विभाग

## अ ) बाजार समिती विभाग

दि. १ एप्रिल २०१७ ते दि. ३१ मार्च २०१८ या अहवाल वर्षात राज्यात एकुण ३०७ बाजार समित्यां व ५९७ उपबाजार कार्यरत आहेत. बाजार समित्यां राज्यातील सर्व जिल्ह्यामध्ये कार्यरत आहेत. राज्यातील कार्यरत असणाऱ्या बाजार समित्यांची विभागनिहाय संख्या खालीलप्रमाणे आहे;

| अ. क्र. | विभाग | मुख्य बाजार | उपबाजार |
|---|---|---|---|
| १. | रत्नागिरी | २० | ४१ |
| २. | नाशिक | ५३ | ११७ |
| ३. | पुणे | २३ | ६७ |
| ४. | औरंगाबाद | ३६ | ६५ |
| ५. | लातूर | ४९ | ८० |
| ६. | अमरावती | ५५ | ९१ |
| ७. | नागपूर | ५० | ७६ |
| ८. | कोल्हापूर | २१ | ६० |
| | **एकूण** | **३०७** | **५९७** |

### १) अंशदान :

महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ३७ (२) अन्वये अहवाल वर्षात महाराष्ट्रातील एकूण ३०२ कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षाच्या एकूण उत्पन्नावर अंशदान आकारणी करण्यात आली.

(रुपये लाखात)

| दि.३१/०३/२०१६ अखेर थकीत | सन २०१६-२०१७ ची अंशदान मागणी | एकूण वसूलपात्र रक्कम | वसूल रक्कम | येणेबाकी |
|---|---|---|---|---|
| ९८०.६० | ३५५५.८२ | ४५३६.४२ | ३५७९.३७ | ९५७.०५ |

### २) कर्ज :

**विकासात्मक कर्ज :**

कृषि पणन मंडळमार्फत बाजार समित्यांना त्यांचे मुख्य व दुय्यम बाजार आवारातील विविध विकास कामे करण्यासाठी अंतरिम व दिर्घ मुदतीची कर्जे (अर्थसहाय्य) म्हणून मंजूर केली जातात. यामध्ये प्रामुख्याने जमीन खरेदी, जमीन संपादन, अंतर्गत रस्ते, रस्त्यांचे डांबरीकरण, पिण्याच्या पाण्याची सोय, लिलाव ओटे, लिलाव ओट्यावर आवश्यकतेप्रमाणे शेड उभारणे, लिलावगृह, कंपाऊंड वॉल, गेट व वॉचमन केबिन, स्वच्छतागृह, विद्युतीकरण, आडत व्यापारी गाळे, शेतकरी बाजार, कांदा चाळ बांधकाम तसेच कमर्शियल शॉपिंग कॉम्प्लेक्स (व्यापारी गाळे) इ. बांधकामांचा समावेश होतो.

अहवाल वर्षात एकूण ८ कृषि उत्पन्न बाजार समित्यांना विविध विकासात्मक कामे करण्यासाठी एकूण रक्कम रु.१०,०६,३०,१५२/- इतके कर्ज ६ टक्के व्याजदराने वितरित करण्यात आलेले आहे.

**अ) तिमाही कर्ज :**

| अ. क्र. | बाजार समितीचे नाव | दिनांक | कर्ज रक्कम रु. | कर्जाचे कारण |
|---|---|---|---|---|
| १ | मंगरुळपीर, जि.वाशिम | २६/०४/२०१७ | १५९०५०५ | (१ ला हप्ता) एम.ए.सी.पी. योजनेअंतर्गत मुख्य व उपबाजार आवारात पायाभूत व उत्पादक सुविधा. |
| २ | उमरेड, जि.नागपूर | १३/०६/२०१७ | ३५१४६९६ | (२ रा हप्ता) एम.ए.सी.पी. योजनेअंतर्गत मुख्य बाजार आवारात पायाभूत व उत्पादक सुविधा. |
| ३ | आष्टी, जि.वर्धा | २७/०६/२०१७ | ५५९३०४० | (१ ला हप्ता) एम.ए.सी.पी. योजनेअंतर्गत उपबाजार कारंजा (घा.) व तळेगांव (शा.पं) येथे पायाभूत व उत्पादक सुविधा. |
| ४ | अमळनेर, जि.जळगांव | ०७/०७/२०१७ | १५२५७७६६ | (१ ला हप्ता) एम.ए.सी.पी. योजनेअंतर्गत विकास कामे. |
| ५ | चोपडा, जि.जळगांव | १९/०७/२०१७ | ६५२८८१८ | (२ रा हप्ता) एम.ए.सी.पी. योजनेअंतर्गत विकास कामे. |
| ६ | कुर्डूवाडी, जि.सोलापूर | २३/०८/२०१७ | ७५००००० | (१ ला हप्ता) उपबाजार मोडनिंब येथे विकास कामे. |
| ७ | आरमोरी, जि.गडचिरोली | १५/०९/२०१७ | ६७७६७१२ | (१ ला हप्ता) एम.ए.सी.पी. योजनेअंतर्गत मुख्य व उपबाजार आवारात विकास कामे. |
| ८ | उमरेड, जि.नागपूर | १३/१०/२०१७ | ५५००००० | (३ रा हप्ता) एम.ए.सी.पी. योजनेअंतर्गत मुख्य बाजार आवारात पायाभूत व उत्पादक सुविधा. |
| ९ | अमळनेर, जि.जळगांव | ०६/११/२०१७ | २१७१६११८ | (२ रा हप्ता) एम.ए.सी.पी. योजनेअंतर्गत विविध विकास कामे. |
| १० | मंगरुळपीर, जि.वाशिम | ०६/११/२०१७ | ५५६२२०० | (२ रा हप्ता) एम.ए.सी.पी. योजनेअंतर्गत मुख्य व उपबाजार आवारात पायाभूत व उत्पादक सुविधा. |
| ११ | तुमसर, जि.भंडारा | १७/०२/२०१८ | ७४८१५४५ | (१ ला हप्ता) मुख्य बाजार आवारात विकास कामे. |
| १२ | मंगरुळपीर, जि.वाशिम | ३१/०३/२०१८ | ४५६६११४ | (३ रा हप्ता) एम.ए.सी.पी. योजनेअंतर्गत मुख्य व उपबाजार आवारात पायाभूत व उत्पादक सुविधा. |
| | **मुदती कर्ज एकुण वाटप** | | **९१५८७५१४** | |

**ब) अंतरिम कर्ज :**

| अ. क्र. | बाजार समिती/संस्थेचे नाव | दिनांक | कर्ज रक्कम रु. | कर्जाचे कारण |
|---|---|---|---|---|
| १. | चोपडा, जि.जळगांव | १९/०७/२०१७ | ३७३०९८६ | (२ रा हप्ता) एम.ए.सी.पी. योजनेअंतर्गत विकास कामे. |
| २. | चोपडा, जि.जळगांव | ०६/११/२०१७ | ५३११६५२ | (३ रा हप्ता) एम.ए.सी.पी. योजनेअंतर्गत विकास कामे. |
| | **अंतरिम कर्ज एकुण वाटप** | | **९०४२६३८** | |

**कर्ज व्याज दर** - दि.०९/०३/२०१६ चे परिपत्रकान्वये राज्यातील सर्व बाजार समित्यांसाठी विविध विकसन कामांसाठी देण्यात येणाऱ्या दिर्घ व अल्प मुदती कर्जावर ६ टक्के सवलतीचा व्याजदर लागू करण्यात आलेला आहे.

**३) अर्थसंकल्प मंजुरी :**

अहवाल वर्षात महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ यातील कलम ३८ आणि त्याखालील नियमातील संबंधित नियमान्वये २९५ बाजार समित्यांचे सन २०१८-२०१९ चे मूळ अर्थसंकल्पांना मंजुरी देण्यात आली. त्याचप्रमाणे १७३ बाजार समित्यांचे सन २०१७-२०१८ चे पुरवणी अर्थसंकल्प मंजुर करण्यात आले. तसेच सन २०१६-२०१७ चे ६२ बाजार समित्यांचे पुर्नविनियोजन पत्रके मंजूर / नामंजुर करण्यात आली.

**४) थेट पणन अंतर्गत राज्यातील बाजार समित्यांच्या कार्यक्षेत्रातील खरेदीवरील बाजार फी बाबत :**

महाराष्ट्र शासनाकडील दि.५ जानेवारी २००४ चे आदेशानुसार महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मधील कलम ५९ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन आय.टी.सी.लि., कारगील इंडिया प्रा.लि.,मेगासेव प्रा.लि.,रिलायन्स फ्रेश लि.,राधाकृष्ण फुडलँड प्रा.लि.,आदित्य बिर्ला क्वाडरँगल ट्रेडिंग सर्व्हिसेस, महा. कंझ्युमर फेडरेशन, महिंद्रा शुभ लाभ या कंपन्यांना उक्त अधिनियमातील कलम ७ मधून सुट देऊन महाराष्ट्र राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या आवाराबाहेर शेतमालाची थेट खरेदी करण्यासाठी काही अटींस अधीन शासनाने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार वरील कंपन्यांकडून शेतमालाची मोठ्या प्रमाणात खरेदी चालू आहे. थेट पणन अंतर्गत राज्यात एकुण ५२७ कंपण्यांना पणन संचालनालयामार्फत परवाना देण्यात आलेला आहे. थेट पणन परवाना प्राप्त धारकांना कृषि पणन मंडळाकडे बाजार फी व देखरेख फी भरावी लागते.

त्यानुसार अनुज्ञप्ती धारक कंपन्यानी दि. ०१/०१/२०१६ ते दि. ३०/०९/२०१७ या कालावधीत कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे कार्यक्षेत्रात खरेदी केलेल्या शेतीमालावरील कृषि पणन मंडळाकडे जमा बाजार फी व देखरेख फी रक्कम रु.१,२३,३५,८५६/- संबंधित बाजार समित्यांचे बँक खात्यावर NEFT व RTGS द्वारे वर्ग करण्यात आली आहे.

# ब) निर्यात विभाग

राज्यातील कृषि मालाची निर्यात वाढावी व त्यासाठी निर्यातक्षम उत्पादनात वाढ होणेकरीता विविध कार्यशाळेच्या माध्यमातुन शेतक-यांना मार्गदर्शन करण्यात आले आहे त्यासाठी कृषि मालाची प्रतवारी, पॅकींग, हाताळणी, साठवणूक इ.साठी आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करणे, प्रशितकरण आणि शितगृहांची उभारणी करणे, शेतकरी, बाजार समित्या आणि फळे भाजीपाला उत्पादक सहकारी संस्था यांना केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनांमधून जास्तीत जास्त अनुदान/आर्थिक सहाय्य उपलब्ध करून निर्यातीला चालना देण्याच्या दृष्टीने कृषि पणन मंडळ प्रयत्नशिल आहे.

**निर्यात वृध्दीकरीता पायाभूत सुविधांची उभारणी -**
राज्यामध्ये उत्पादीत होणा-या विविध कृषि उत्पादनांच्या निर्यातवृध्दीच्या दृष्टीने केंद्र व राज्य शासनामार्फत राज्यामध्ये हापूस आंबा, केशर आंबा, कांदा, संत्रा, केळी, डाळिंब व फुले या उत्पादनांकरिता कृषि निर्यात क्षेत्रांची स्थापना करण्यात आलेली आहे. हापूस आंबा, केशर आंबा, कांदा, संत्रा, केळी, डाळिंब या कृषि निर्यात क्षेत्रांच्या अंमलबजावणीसाठी कृषि पणन मंडळाची नोडल एजन्सी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली होती. नोडल एजन्सी या नात्याने कृषि पणन मंडळामार्फत विविध कृषि उत्पादनांच्या निर्यातीसाठी राज्यात खालीलप्रमाणे पायाभूत सुविधांची उभारणी करण्यात आलेली आहे.

| अ. क्र. | सुविधा | संख्या | एकुण प्रशितकरण संख्या | प्रशितकरण क्षमता मे. टन | शीतगृह संख्या | शीतगृह क्षमता मे. टन | रायपनिंग चेंबर मे. टन | रायपनिंग चेंबर क्षमता मे. टन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | निर्यात सुविधा केंद्र | २२ | २० | १०० | ३५ | १११९ | १२ | २११ |
| २. | आधुनिक फळे व भाजीपाला सुविधा केंद्र | २० | २० | १०० | २० | ५०० | ०० | ०० |
| ३. | फुले निर्यात सुविधा केंद्र | ३ | ६ | ३० | १२ | ३०० | ०० | ०० |
| **एकुण** | | **४५** | **४६** | **२३०** | **६७** | **१९१९** | **१२** | **२११** |

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाने अपेडा व राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या अर्थसहाय्याने राज्यात निर्यात सुविधा केंद्र (२२), आधुनिक फळे व भाजीपाला निर्यात सुविधा केंद्र (२०) व फुले निर्यात सुविधा केंद्र (३) एकूण ४५ निर्यात सुविधा केंद्रांची उभारणी केलेली आहे. ज्यामुळे शीतगृह क्षमता १९१९ मे. टन, प्रशितकरण २३० मे. टन व रायपनींग चेंबर २११ मे. टन इतकी क्षमता निर्माण झाली. सदर सुविधा केंद्रावरुन सुमारे ७०,९०६ मे.टना पेक्षा जास्त कृषिमालाची निर्यात करण्यात आलेली आहे. तर फुले निर्यात सुविधा केंद्र, तळेगाव दाभाडे जि. पुणे येथून १२७.७२ लाख गुलाब फुलांचे स्टेम्स इंग्लंडसह इतर देशांना निर्यात करणेत आली आहे. दि. १३.७.२०१७ रोजी आंना निर्यात सुविधा केंद्र, गोरेगाव हे एम. ए. आय. डी. सी. यांना परत करण्यात आले.

**विभागनिहाय निर्यात सुविधा केंद्रांचा तपशील -**

| विभागाचे नाव | अ. क्र. | सुविधा केंद्राचे नांव | ठिकाण | प्रकल्पातील समाविष्ठ घटक | | प्रक्रिया मे.टन |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | घटक | क्षमता | |
| **पुणे** | १ | शेतमाल निर्यात सुविधा केंद्र, इंदापूर | शिवलीलानगर, इंदापुर – अकलुज रोड इंदापुर, जि.पुणे | हाताळणी यंत्रणा | १० मे. टन / तास | ---- |
| | | | | कांदा साठवणूक सुविधा | ५०० मे. टन | |
| | | | | निर्यातदार गाळे - ३६० स्के.मी. | | |
| | | | | प्रशासकीय इमारत - २३३ स्के.मी. | | |
| | २ | A) कोल्ड स्टोरेज युनिट, इंदापुर, जि. पुणे. | शिवलीलानगर, इंदापुर – अकलुज रोड इंदापुर, जि.पुणे | कोल्ड स्टोरेज | ३ x ४० मे. टन | १३६.७१ |
| | | | | प्रिकुलिंग | ५ मे. टन/बॅच | --- |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | १६० KVA | |
| | | | | डी.जी. सेट | १०० KVA | |
| | | B) आईस मेकींग युनीट | | आईस स्टोरेज | ४० मे. टन | |
| | | | | आईस टॅंक | ५ मे. टन /दिवस | |
| | ३ | केळी निर्यात सुविधा केंद्र इंदापूर | कृषि उत्पन्न बाजार समिती, इंदापुर, मुख्य बाजार, इंदापुर-अकलुज रोड, शिवलिला मार्केट, ता. इंदापुर, जि. पुणे. | प्रिकुलिंग | ५ मे. टन / बॅच | -- |
| | | | | कोल्ड स्टोरेज | २५ मे.टन | |
| | | | | रायपनिंग चेंबर | ४ x २५ मे. टन | |
| | | | | दोन पॅकहाऊस (वालचंदनगर व अकलुज) | ४८८५ स्क्वे. फुट प्रत्येकी | |
| | | | | डि.जी. सेट | १७५ KVA | |
| | **४** | द्राक्षे व डांळिब निर्यात सुविधा केंद्र, बारामती | जळोची, ता बारामती जि.पुणे, | प्रिकुलिंग | ५ मे. टन / बॅच | ५००.०३ आंबा व डाळींब |
| | | | | कोल्ड स्टोरेज | २ x २५ मे. टन | |
| | | | | पॅक हाऊस | ४०३५ स्क्वे. फुट | |
| | | | | हाताळणी यंत्रणा | १.५ मे. टन / तास | |
| | | | | डी.जी. सेट | १२५ KVA | |
| | ५ | फुले निर्यात सुविधा केंद्र तळेगांव (दा) ता.मावळ जि.पुणे | महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ, (फ्लोरीकल्चर पार्क) जोग सेंटर - मुंबई - पुणे रोड, वाकडेवाडी एमआयडीसी, तळेगाव,जि.पुणे | प्रिकुलिंग | २ x ५ मे.टन / बॅच | ७८.८६ लाख गुलाब स्टेम्स |
| | | | | कोल्ड स्टोरेज | ४ x २५ मे.टन | |
| | | | | पॅकहाऊस | ६००४ चौ.फुट | |
| | | | | डि.जी. सेट | २०० KVA | |
| | | | | ट्रान्स फॉर्मर | २०० KVA | |

| विभागाचे नाव | अ. क्र. | सुविधा केंद्राचे नांव | ठिकाण | प्रकल्पातील समाविष्ठ घटक | | प्रक्रिया मे.टन |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | घटक | क्षमता | |
| | ६ | निर्यात सुविधा केंद्र, तळेगाव | हॉर्टीकल्चर ट्रेनिंग सेंटर, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि.पुणे. | प्रिकुलिंग | ५ मे. टन. / बॅच | |
| | | | | कोल्ड स्टोरेज | ५० मे. टन | |
| | | | | पॅक हाउस | ८०० स्क्वे. फुट | |
| **कोल्हापूर** | ७ | A) डाळींब व द्राक्ष निर्यात सुविधा केंद्र आटपाडी | कृषि उत्पन्न बाजार समिती, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली. | प्रिकुलिंग | ५ मे. टन / बॅच | ३८ मे. टन द्राक्षे व डाळींब |
| | | | | कोल्ड स्टोरेज | २ x २५ मे.टन | |
| | | | | पॅकहाऊस | २००० स्क्वे. फुट | |
| | | | | डि.जी. सेट | २०० KVA | |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | २०० KVA | |
| | ८ | फुले निर्यात सुविधा केंद्र-सातारा, जि. सातारा | अजिंक्यतारा शेतकरी सहकारी फळे, फुले व भाजीपाला खरेदी विक्री संस्था मर्या. ता. सातारा,जि.सातारा | प्रिकुलिंग | २ x ५ मे.टन / बॅच | --- |
| | | | | कोल्ड स्टोरेज | ४ x २५ मे.टन | |
| | | | | डि.जी. सेट | २०० KVA | |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | ३१५ KVA | |
| **रत्नागिरी** | ९ | हापुस आंबा निर्यात सुविधा केंद्र, नाचणे | शांतीनगर, नाचणे रोड, ता. जि. रत्नागीरी | प्रिकुलिंग | ५ मे. टन. / बॅच | १३.५० मे. टन आंबा |
| | | | | कोल्ड स्टोरेज | २५ मे.टन | |
| | | | | रायपनिंग चेंबर | ५ मे.टन | |
| | | | | पॅकहाऊस | ६००० स्क्वे. फुट | |
| | | | | हाताळणी यंत्रणा | १.५ मे.टन / तास | |
| | | | | प्लॅस्टिक क्रेट्स | ८०० नग | |
| | | | | डी.जी. सेट | १०० KVA | |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | १६० KVA | |
| | १० | हापुस आंबा निर्यात सुविधा केंद्र, जामसंडे | जामसंडे, ता देवगड, जि. सिंधुदुर्ग | प्रिकुलिंग | ५ मे. टन. / बॅच | १८३.५० आंबा पल्प |
| | | | | कोल्ड स्टोरेज | २५ मे.टन | |
| | | | | रायपनिंग चेंबर | ५ मे.टन | |
| | | | | पॅकहाऊस | ६००० स्क्वे. फुट | |
| | | | | हाताळणी यंत्रणा | १.५ मे.टन / तास | |
| | | | | प्लॅस्टिक क्रेट्स | ९०० नग | |
| | | | | डी.जी. सेट | १०० KVA | |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | १६० KVA | |
| | ११ | विकीरण सुविधा केंद्र वाशी | सेक्टर १९, दाना बंदर गेट नं- २ समोर, वाशी, नवी मुंबई. | रॅडिएशन सोर्स | कोबाल्ट ६० | ९७०.५९ आंबा, पाळीव प्राण्यांचे खाद्य, व मसाले |
| | | | | सोर्स तिव्रता | ५०० कि.क्युरी | |
| | | | | रॅडिएशन युनिट (आंबा) | ५ मे. टन / तास | |
| | | | | कोल्ड स्टोरेज | ७६ मे.टन | |
| | | | | डि.जी.सेट | ५०० KVA | |
| | | | | ट्रान्सरफॉर्मर | ५०० KVA | |

| विभागाचे नाव | अ. क्र. | सुविधा केंद्राचे नांव | ठिकाण | प्रकल्पातील समाविष्ठ घटक | | प्रक्रिया मे.टन |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | घटक | क्षमता | |
| | १२ | भाजीपाला प्रक्रिया केंद्र, वाशी | सेक्टर १९, दाना बंदर गेट नं- २ समोर, वाशी, नवी मुंबई. | प्रिकुलिंग | ५ मे.टन / तास | ६६६.३१ भाजीपाला प्रक्रिया |
| | | | | कोल्ड स्टोरेज | ९८ मे.टन | |
| | १३ | निर्यात सुविधा केंद्र वाशी, नवी मुंबई(व्ही.एच.टी.) | निर्यात भवन, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती,भाजीपाला बाजार आवार, सेक्टर नं.२१,वाशी, मुंबई. | व्हि.एच.टी. मशिन | १.५ मे.टन / बॅच | १२५ मे. टन आंबा |
| | | | | कोल्ड स्टोरेज | २ x ५० मे. टन | |
| | | | | पॅक हाऊस | ४००० स्के.फुट | |
| | | | | हाताळणी यंत्रणा | १ मे.टन / तास | |
| | | | | प्लॅस्टिक क्रेट्स | ४३२ नग | |
| | | | | ॲल्युमिनीअम पॅलेट | १२ नग | |
| | | | | डी.जी. सेट | १२५ KVA | |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | ५०० KVA | |
| | १४ | आंबा पॅक हाऊस, गोरेगांव | गेट नं. ३, महाराष्ट्र कृषि उद्योग विकास मंडळ, गोरेगांव यांचे फुले लिलाव केंद्र | प्रिकुलिंग | ५ मे.टन / बॅच | ४६.५४ मे. टन आंबा |
| | | | | रायपनिंग चेंबर | ११ मे.टन | |
| | | | | ग्रेडिंग लाईन | ३ मे.टन / तास | |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | ३१५ KVA | |
| **नाशिक** | **१५** | कांदा, द्राक्ष व डाळिब निर्यात सुविधा केंद्र, कळवण | मु.पो.भेंडी, ता कळवण ,जि. नाशिक। | प्रिकुलिंग | ५ मे. टन. / बॅच | १०० मे. टन कांदा साठवण |
| | | | | कोल्ड स्टोरेज | ५० मे. टन | |
| | | | | पॅक हाऊस | ४३५० स्के.मी. X २ | |
| | | | | हाताळणी यंत्रणा | २ मे.टन / तास | |
| | | | | कांदा साठवणूक | ८ x ५० मे.टन | |
| | | | | स्टाफ कॉर्टर | २ x १ BHK | |
| | | | | प्लॅस्टिक क्रेट्स | १००० नग | |
| | | | | डी.जी. सेट | १६० KVA | |
| | १६ | कांदा निर्यात सुविधा केंद्र चांदवड | कृषि उत्पन्न बाजार समिती, चांदवड मौजे. चांदवड, ता. चांदवड, जि. नाशिक | प्रिकुलिंग | ५ मे.टन / बॅच | ३८० मे.टन (कांदा) |
| | | | | कोल्ड स्टोरेज | ५० मे.टन | |
| | | | | पॅकहाऊस | ४७६५ क्स्वे. फुट | |
| | | | | डि.जी. सेट | १६० KVA | |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | १६० KVA | |
| | | | | कांदा चाळ | ३५० मे.टन | |
| | | | | प्लॅस्टिक क्रेट्स | ५०० नग | |
| | १७ | फुले निर्यात सुविधा केंद्र मोहाडी ता.दिंडोरी जि.नाशिक | कृषि उत्पन्न बाजार समिती, दिंडोरी, उपबाजार आवार, मोहाडी, गट नं- १२८६ ता. | प्रिकुलिंग | ५ मे.टन / बॅच x २ | ५५१३.३४ मे.टन द्राक्ष निर्यात |
| | | | | कोल्ड स्टोरेज | २०० मे.टन | |
| | | | | पॅकहाऊस | ६००४ चौ.फुट | |
| | | | | डि.जी. सेट | २०० KVA | |

| विभागाचे नाव | अ. क्र. | सुविधा केंद्राचे नांव | ठिकाण | प्रकल्पातील समाविष्ठ घटक | | प्रक्रिया मे.टन |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | घटक | क्षमता | |
| | | | दिंडोरी,जि.नाशिक | | | |
| | १८ | केळी निर्यात सुविधा केंद्र, सावदा. | ता.रावेर, जि,जळगाव | प्रिकुलिंग | ५ मे. टन. / बॅच | ----- |
| | | | | कोल्ड स्टोरेज | २५ मे. टन. | |
| | | | | रायपनिंग चेंबर | २५ मे.टन / बॅच | |
| | | | | पॅकहाऊस | ५७०० स्क्वे. फुट | |
| | | | | हाताळणी यंत्रणा | २ मे.टन / तास | |
| | | | | प्लॅस्टिक पॅलेट्स | १५० नग | |
| | | | | वे-ब्रिज | ६० मे.टन | |
| | | | | स्टाफ कॉर्टर | २ x १ BHK | |
| | | | | डी.जी. सेट | १४० KVA | |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | १६० KVA | |
| | १९ | फळे व भाजीपाला निर्यात सुविधा केंद्र खडकेवाके | मौजे- खडकेवाके, ता.रहाता, जि. अहमदनगर | प्रिकुलिंग | ५ मे.टन / बॅच | ----- |
| | | | | कोल्ड स्टोरेज | १५० मे.टन | |
| | | | | पॅकहाऊस | ६९६४ स्क्वे.फुट | |
| | | | | हँडलिंग लाईन | २ मे.टन / तास | |
| | | | | डि.जी. सेट | २०० KVA | |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | ३१५ KVA | |
| **औरंगाबाद** | २० | केशर आंबा निर्यात सुविधा केंद्र, जालना | कृषी उत्पन्न बाजार समिती जालना मार्केट यार्ड, जालना, जि.जालना | प्रिकुलिंग | ५ मे. टन. / बॅच | |
| | | | | कोल्ड स्टोरेज | ५० मे.टन | ----- |
| | | | | रायपनिंग चेंबर | ५ मे.टन / बॅच | |
| | | | | पॅकहाऊस | ६००० स्क्वे. फुट | |
| | | | | हाताळणी यंत्रणा | १.५ मे.टन / तास | |
| | | | | वॅक्सिंग युनिट | | |
| | | | | अग्निशमन व्यवस्था | | |
| | | | | प्लॅस्टिक पॅलेट्स | १५० नग | |
| | | | | प्लॅस्टिक क्रेट्स | ३७२ नग | |
| | | | | डी.जी. सेट | १४० KVA | |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | १६० KVA | |
| | २१ | केळी निर्यात सुविधा केंद्र, वसमत. | ता.वसमत, जि. हिंगोली. | प्रिकुलिंग | ५ मे. टन. / बॅच | |
| | | | | कोल्ड स्टोरेज | २५ मे. टन. | |
| | | | | रायपनिंग चेंबर | २५ मे.टन/बॅच | |
| | | | | पॅकहाऊस | ५७०० स्क्वे. फुट | |
| | | | | हाताळणी यंत्रणा | २ मे.टन / तास | |
| | | | | प्लॅस्टिक पॅलेट्स | १५० नग | |
| | | | | वे-ब्रिज | ६० मे.टन | |
| **लातुर** | २२ | केशर आंबा निर्यात | कृषि उत्पन्न बाजार समिती, बिड, | प्रिकुलिंग | ५ मे. टन / बॅच | ------- |
| | | | | कोल्ड स्टोरेज | ५० मे.टन | |

| विभागाचे नाव | अ. क्र. | सुविधा केंद्राचे नांव | ठिकाण | प्रकल्पातील समाविष्ठ घटक | | प्रक्रिया मे.टन |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | घटक | क्षमता | |
| | | सुविधा केंद्र बीड | ग्रामपंचायत बहीरवाडी, ता. बीड, जि. बीड. | रायपनिंग चेंबर | १० मे.टन | |
| | | | | पॅक हाऊस | ३८७५ स्क्वे. फुट | |
| | | | | डि.जी. सेट | १६० KVA | |
| | | | | ट्रान्सफॉर्मर | १६० KVA | |
| | २३ | केशर आंबा व डाळिंब निर्यात सुविधा केंद्र, लातुर. | एम.आय.डी.सी लातुर जि. लातुर | प्रिकुलिंग | ५ मे. टन. / बॅच | ५०३ सफरचंद, डाळींब ई. |
| | | | | कोल्ड स्टोरेज | १०० मे.टन | |
| | | | | पॅकहाऊस | ५७०० स्क्वे. फुट | |
| | | | | रायपनिंग चेंबर | २५ मे.टन / बॅच | |
| | | | | हाताळणी यंत्रणा | २ मे.टन / तास | |
| | | | | वे-ब्रिज | ६० मे.टन | |
| | | | | प्लॅस्टिक क्रेट्स | १००० नग | |
| | | | | स्टाफ कॉर्टर | २ x १ BHK | |
| | | | | डी.जी. सेट | २५० KVA | |
| **अमरावती** | २४ | संत्रा निर्यात सुविधा केंद्र वरुड | डॉ.पंजाबराव देशमुख कृषि शेती माल प्रक्रिया, पणन सहकारी संस्था मर्या. वरुड, जि. अमरावती | प्रिकुलिंग | ५ मे.टन / बॅच | ६५ मे.टन संत्रा |
| | | | | कोल्ड स्टोरेज | २५ मे.टन | |
| | | | | ग्रेडिंग लाईन | २ मे.टन/ तास | |
| | | | | डि.जी. सेट | १६० KVA, | |
| | | | | | ३० KVA | |
| | | | | ट्रान्स फॉर्मर | १६० KVA | |
| | | | | वे-ब्रिज | ६० मे.टन | |
| | | | | स्टाफ कॉर्टर | २ x १ BHK | |
| **नागपुर** | २५ | संत्रा निर्यात सुविधा केंद्र, कारंजा (घा ). | ता.आष्टी, जि. वर्धा. | प्रिकुलिंग | ५ मे. टन. / बॅच | ३९६.२ मे.टन संत्रा |
| | | | | कोल्ड स्टोरेज | २५ मे. टन | |
| | | | | पॅकहाऊस | ३३०० स्क्वे. फुट | |
| | | | | हाताळणी यंत्रणा | २ मे.टन / तास | |
| | | | | वॅक्सिंग युनिट | | |
| | | | | प्लॅस्टिक क्रेट्स | ७००० नग | |
| | | | | वे-ब्रिज | ६० मे.टन | |

## फळे व भाजीपाल्याकरिता मॉडर्न मार्केटिंग सुविधा (२०)

| विभागाचे नाव | आधुनिक फळे व भाजीपाला निर्यात सुविधा केंद्र | प्रकल्पातील समाविष्ठ घटक | प्रक्रीया तपशील मे.टन |
|---|---|---|---|
| पुणे विभाग | शेलपिंपळगाव, ता.खेड,जि.पुणे | ○ कोल्ड स्टोरेज २५मे.टन<br>○ प्रिकुलिंग ५मे.टन प्रति बॅच<br>○ अँन्टीचेंबर,प्लँटरूम, ऑफिस,स्टोअररूम<br>○ पॅकहाऊस एरिया - १५००स्क्वे.फूट<br>○ इलेक्ट्रिक व डी.जी.सेट<br>○ इनपुटशॉप-३<br>○ वॉटर सप्लाय<br>○ लॅबोरेटरी | २०७.६८ मे. टन |
| | बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर | | ----- |
| कोल्हापुर | मसूर, ता.कराड,जि.सातारा | | २८८.०० बेबीकॉर्न, भाजीपाला |
| | म्हसवड, ता. माण, जि.सातारा | | ----- |
| | तळसंदे ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर | | ----- |
| रत्नागीरी | पालघर, ता. पालघर जि.ठाणे | | ----- |
| नाशीक | ठाणगाव, ता.सिन्नर, जि.नाशिक | | १२५ मे. टन कांदा |
| | लोणी, ता.रहाता,जि.अ.नगर | | ----- |
| | शिरपूर, ता. शिरपूर जि.धुळे | | ----- |
| | पाडळसा , ता. यावल जि.जळगाव | | ----- |
| औरंगाबाद | करमाड,ता. जि.औरंगाबाद | | ----- |
| | घनसावंगी, ता. घनसावंगी, जि.जालना | | ----- |
| | कळमनुरी, ता. कळमनुरी, जि.हिंगोली | | ----- |
| अमरावती | चांदूररेल्वे, ता. चादुंररेल्वे, जि.अमरावती | | ४८०.७ मे. टन भाजीपाला (भेंडी) |
| | देऊळगांवराजा, ता. देऊळगांवराजा, जि.बुलढाणा | | ----- |
| लातुर | अर्धापूर, ता. अर्धापूर, जि.नांदेड | | ११४० मे. टन केळी |
| | माजलगाव, ता. माजलगाव, जि.बीड | | ------ |
| नागपुर | भिवापूर, ता. भिवापूर, जि.नागपूर | | ---------- |
| | मोहाडी, ता.मोहाडी, जि.भंडारा | | ---------- |
| | पुलगाव, ता.देवळी, जि.वर्धा | | ---------- |

सुमारे १२००० मे. टन ताजी फळे, भाजीपाला व ७५ लाख गुलाब प्रक्रिया करून स्थानिक वितरण अथवा निर्यातीसाठी रवाना करण्यात आली. ज्या जिल्ह्यांमधे सुविधा उभारण्यात आलेल्या आहेत तेथील सुमारे २००० कुशल व अकुशल हातांना या सुविधांमुळे काम प्राप्त झाले.

**इतर कामकाज -**

**व्ही.एच.टी. आंबा निर्यात –**

सन २००६ पासून सन २०१६ पर्यंत व्ही.एच.टी. वाशी येथुन जपान, न्युझीलंड, युरोपिय देश येथे ७२८.३७ मे. टन आंबा निर्यात करण्यात आलेला होता. तर सन २०१७-१८ मध्ये १२५.४० मे. टन आंबा युरोपियन देश व न्युझीलंड येथे निर्यात करण्यात आलेला असुन सदर सुविधेवरुन एकुण आंबा ८५३.८३ मे. टन निर्यात करण्यात आलेला आहे.

**संत्रा निर्यात सुविधा केंद्र, कारंजा घाडगे वरून संत्र्याची प्रायोगिक निर्यात –**

विदर्भ विभागातून प्रथमच सदर सुविधेवरून माहे फेब्रुवारी व मार्च, २०१८ मधे संत्र्याची दुबई, दोहा व बहारीन येथे हवाईमार्गे निर्यात करण्यात आली. त्याचा प्रतिसाद चांगला आला असून पुढील वर्षी निर्यातदार व शेतकरी

यांचेमार्फत नागपुरी संत्र्याची नागपुर विमानतळावरून संयुक्त अरब अमिरातींमधे मोठ्या प्रमाणावर निर्यातीचे नियोजन करण्यात येत आहे.

**केळी क्लस्टर विकास कार्यक्रम –**

केळी व भाजीपाल्याचे उत्पादनासाठी विदर्भ क्षेत्र सक्षम असून अकोला जिल्हा प्रशासन, अपेडा व पणन मंडळ यांच्या संयुक्त प्रयत्नाने अकोला जिल्ह्यातील अकोला तालुक्यामधील १०० हेक्टर जागेवर केळी क्लस्टरचा विकास करण्यात येत आहे. पणन मंडळाने या उपक्रमामधे सक्रिय सहभाग घेतला असून शेतकरी व निर्यातदार यांचे समन्वयाने निर्यातक्षम उत्पादनासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. यानुसार शेतकरी व निर्यातदार यांचेमधे पुरवठा करार करण्यात येत असून त्यानुसार शेतकऱ्यांना रावेर बाजार, जि. जळगाव पेक्षा रू. १/- प्रति किलो एवढी अतिरीक्त रक्कम निर्यातदाराकडून प्राप्त होणार आहे. या भागातून केळीची निर्यात सुस्थापित झालेली असून अमरावती जिल्ह्यामधील शेतकऱ्यांना केळी, भेंडी, हिरवी मिरची इ. उत्पादने घेण्यासाठी प्रयत्न सुरू करण्यात आले आहेत. केळी उत्पादन वाढावे यासाठी अकोला व अमरावती जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणावर प्रयत्न सुरू करण्यात आलेले आहेत.

**विदर्भातून मिरची निर्यात –**

पणन मंडळामार्फत विदर्भातून मिरची निर्यातीला चालना देण्यात येत असून त्याअनुषंगाने नागपूर विमानतळावरून सुमारे ४०० मे. टन जी-४ वाणाची मिरची निर्यात करण्यात आली. सदर मिरचीवर निर्यातक्षम प्राथमिक प्रक्रिया चांदूर रेल्वे निर्यात सुविधा केंद्रावर करण्यात आलेली आहे.

**निर्यात सुविधा केंद्र गोरेगाव –**

सदर सुविधा महाराष्ट्र कृषि विकास महामंडळ, मुंबई यांचेकडून फेब्रुवारी २०१४ मध्ये ३ वर्षासाठी ताब्यात घेण्यात आलेली होती. युरोपियन देशांस आंबा निर्यात करणेसाठी सन २०१५ मध्ये अपेडाच्या अर्थसहाय्याने सदर सुविधेवर उष्णजल प्रक्रीया प्रकल्प उभारण्यात आला होता. सदर सुविधेवरुन सन २०१५ मध्ये ३३१ मे. टन आंबा युरोपियन युनियनमधील देशांस निर्यात करण्यात आला. तर सन २०१६ मध्ये १४० मे. टन आंबा युरोपियन युनियन येथे निर्यात करण्यात आला. अशा रितीने सदर सुविधेवरुन एकूण ४७१ मे. टन आंबा निर्यात करण्यात आलेला आहे.

**विकिरण सुविधा केंद्र वाशी –**

तब्बल १८ वर्षाच्या प्रतिक्षेनंतर सन २००६ मध्ये अमेरीकन बाजारपेठ भारतीय आंब्यासाठी खुली झाली होती. परंतु त्यासाठी प्राथमिक अट ही आंबा विकिरण प्रक्रीया करुन पाठवणे अशी होती. त्यासाठी पणन मंडळामार्फत बी.ए.आर.सी.च्या मालकीची कृषक विकिरण सुविधा वाहतुकीच्या दृष्टीने सोईस्कर नव्हती. त्यामुळे निर्यातदारांच्या मागणीनुसार व अपेडाच्या मार्गदर्शनाने कृषि पणन मंडळामार्फत मोठ्या क्षमतेच्या विकिरण सुविधेची उभारणी वाशी , नवि मुंबई येथे अपेडा व राष्ट्रीय कृषि विकास योजना यांच्या अर्थसहाय्याने तसेच स्वत:चा अतिरिक्त निधी वापरुन सुविधा उभारणेचे कामकाज पुर्ण झाले असुन AERB व DAE चे प्रमाणीकरण पुर्ण झाले आहे. तसेच सन २०१६ मध्ये सुविधेस यु.एस.डी.ए. यांची मान्यता प्राप्त झाली आहे. सदर सुविधेवरुन दि. १६ एप्रिल २०१६ रोजी अमेरीकन निरीक्षकांच्या उपस्थीतीत डाळींबाचे डोज मॅपींग करण्यात आले. सदर डोज मॅपींग यशस्विरित्या झाल्याने सदरच्या अहवालाच्या आधारे भारतातुन कृषि पणन मंडळाच्या विकिरण सुविधेवरुन दि. २९ एप्रील २०१६ पासुन अमेरीकन निरिक्षक यांचे नियंत्रणाखाली १८८.५० मे. टन आंबा व १.५ मे. टन डाळींब विकिरण प्रक्रिया करण्यात येवुन अमेरीका येथे यशस्विरित्या निर्यात झालेली आहे. सन २०१७-१८ मधे ४७१ मे. टन आंबा, ३४४ मे. टन पाळीव प्राण्यांचे खाद्य, ७२ मे.

टन मसाले हे अमेरिका, ऑस्ट्रेलिया, नेदरलँड्स, जर्मनी. या सुविधेवरून ऑस्ट्रेलिया या देशाला निर्यातीसाठी डाळींब प्रक्रिया करण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

**भाजीपाला प्रक्रिया केंद्र, वाशी, नवी मुंबई :**

युरोपीय समुदायाने चार भाजीपाल्यावर केलेल्या आयातबंदीच्या अनुषंगाने अपेडा यांच्या मार्गदर्शन व अर्थसहाय्याने वाशी, नवी मुंबई येथे भाजीपाला प्रक्रिया केंद्राची उभारणी करण्यात आलेली आहे. सदर सुविधा चालवा-व-देखरेख तत्वावर देण्याकरिता संस्था निवडीसाठी विहीत पद्धतीने ई-टेंडर प्रक्रिया राबवून सुविधा वापराबाबत मे. खुशी इंटरनॅशनल, वाशी यांना सप्टेंबर २०१५ ते सप्टेंबर २०१८ पर्यंत कार्यादेश देण्यात आलेले आहेत. सदर सुविधा अपेडा यांचेमार्फत युरोप येथे निर्यातीकरिता प्रमाणित करण्यात आलेली आहे. सदर सुविधेवरुन सन २०१७-१८ मधे १४०.२२ मे. टन आंबा व ३८४.७६ मे. टन ताज्या भाजीपाल्याची युरोपीय देशांना निर्यात करण्यात आली.

**निर्यातक्षम पिकांच्या कार्यशाळा :-**

- दि. ११.७.२०१७ रोजी मॉरिशस येथून आलेल्या प्रतिनिधी मंडळासमवेत खरेदीदार-विक्रेता संमेलनामधे शेतकरी उत्पादक कंपन्यांनी सहभाग घेतला होता.
- दि. ६.८.२०१७ रोजी लाटविया देशातून आलेल्या प्रतिनिधी मंडळासमवेत खरेदीदार-विक्रेता संमेलनामधे शेतकरी उत्पादक कंपन्यांनी सहभाग घेतला होता.
- दि. २.९.२०१७ रोजी डहाणू, जि. पालघर येथे भेंडी पिकाच्या निर्यातीसाठी एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.
- माहे डिसेंबर, २०१७ मधे अकोला, जि. अकोला येथे निर्यातक्षम भाजीपाला उत्पादनाशी संबंधित एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.
- माहे फेब्रुवारी, २०१८ मधे रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्ह्यातील आंबा उत्पादकांसाठी खरेदीदार-विक्रेता संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

**राज्यातील प्रगतशील व इच्छूक शेतकरी, उद्योजक यांचेसाठी हॉर्टीकल्चर एक्सपोर्ट ट्रेनिंग कोर्सचे आयोजन —**

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत निर्यातपूरक उपक्रमांमधे वाढ करावी हा विचार करून महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत " हॉर्टीकल्चर एक्सपोर्ट ट्रेनिंग कोर्स " आयोजनास माहे डिसेंबर २०१५ पासुन सुरूवात करण्यात आलेली आहे. हा कोर्स प्रमाणपत्र अभ्यासक्रम असून तो प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात आयोजीत केला जातो. त्याचा कालावधी (५ दिवस) आहे. संबंधीत ट्रेनिंग चे प्रशिक्षण शुल्क प्रति व्यक्ती निवासी रु. ८६००/- अनिवासी रु. ७५००/- व महिलांसाठी प्रशिक्षण शुल्कात ४० % सवलत देण्यात आलेली आहे. जी. एस. टी. सह इतर इनपुट खर्चामधे वाढ झाल्या कारणाने प्रशिक्षण शुल्कामधे माहे जानेवारी, २०१८ पासून वाढ करण्यात आली असून सुधारीत शुल्क निवास व्यवस्थेसह रू. १०,१४८/-, निवास व्यवस्थेशिवाय रू. ८,८५०/- व महिलांसाठी रू. ७,६७०/- (२५ टक्के सवलत) एवढ्या शुल्काची आकारणी करण्यात येत आहे.

- प्रशिक्षणामधे पुढील विषयांवर मार्गदर्शन करण्यात येत आहे.
- ताजी फळे व भाजीपाला निर्यात संधी व पणन मंडळाचे कार्य
- निर्यात प्रक्रिया, परवाने, नोंदणी व वीमा
- इनव्हॉईस, पॅकींग लिस्ट, इ. कागदपत्रांची तोंडओळख
- उत्पादनांचा अभ्यास, एच. एस. कोड, आंतरराष्ट्रीय परिस्थिती
- क्वालीटी पॅरॅमिटर्स, फायटो सॅनिटरी, ॲगमार्क स्टँडर्स, ट्रेसनेट, MRL/PHI

- पॅकींग, पॅकेजींग, एअर व सी शिपींग, CHA यांच्या जबाबदाऱ्या
- कृषिमालाची वाहतुक व पुरवठा यंत्रणा (स्थानिक, आंतरदेशीय)
- टर्मिनॉलॉजीज, UCPDC, बँकींग प्रक्रिया, पेमेंट रिस्क
- निर्यातदारांसाठी RKVY, APEDA, MEIS, शासनाच्या योजना
- निर्यातीसाठी प्रमाणपत्रे (GAP, Human Consumption etc.)
- सुविधा केंद्र गरज (IFC,VHT,HWIT,VPF,PC,CS,RC)
- फळ भाजीपाल्यावर विशेष प्रक्रिया पद्धती
- करार शेती व पणन कायद्यातील बदलामुळे पणन संधी

सन २०१७-१८ मधे १२ प्रशिक्षण सत्रांच्या माध्यमातून २९८ प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षीत करण्यात आले असून सुमारे २० प्रशिक्षणार्थींनी व्यवसाय सुरू केल्याची माहिती प्राप्त झाली आहे. तसेच हॉर्टीकल्चर एक्सपोर्ट ट्रेनिंग कोर्सचे ५ विद्यार्थी हे माहे नोव्हेंबर, २०१७ मधे UNCTAD मार्फत मुंबई येथे आयोजित प्रशिक्षण सत्रामधे सहभागी झाले होते.

**ग्लोबलगॅप प्रमाणीकरण अनुदान योजना -**

युरोपियन देश, अमेरिका व जपान अशा प्रगत राष्ट्रांना राज्यातील शेतमालाची विशेष करुन फळांची निर्यात करण्यासाठी ग्लोबलगॅप प्रमाणपत्र असणे अत्यंत आवश्यक आहे. हापूस आंबा, केशर आंबा, डाळींब, केळी व संत्रा या फळपिकांच्या निर्यातीस चालना मिळण्याच्या दृष्टीने ग्लोबलगॅप प्रमाणिकरणासाठी शेतक-यांची संख्या वाढवणे गरजेचे आहे. आजअखेर २८९ शेतक-यांना ग्लोबलगॅप प्रमाणपत्र प्राप्त असून त्यासाठी प्रमाणिकरण योजनेचे माध्यमातून शुल्काच्या ५० टक्के रक्कम किंवा जास्तीत जास्त रु.७५००/- प्रति शेतकरी याप्रमाणे कृषि पणन मंडळाकडुन अनुदान अदा केलेले आहे. सन २०१६-१७ साठी हापूस आंबा, केशर आंबा, डाळींब, केळी व संत्रा या फळपिकांकरीता प्रोत्साहनपर ग्लोबलगॅप प्रमाणिकरण अनुदान योजना राबविणेत आलेली होती. सन २०१७-१८ या कालावधीत सदर योजनेची अंमलबजावणी सुरू होती. तथापि अनुदानासाठी एकही प्रस्ताव प्राप्त झाला नाही.

# प्रकल्प विभाग

**१) प्रकल्प सल्ला सेवा :**
पणन मंडळाकडून राज्यातील बाजार समित्यांना व सहकारी संस्थांना गेल्या काही वर्षात प्रकल्प सल्ला पुरविण्यात आला. या उपक्रमास मिळालेला प्रतिसाद लक्षात घेवून सर्व सोयींनीयुक्त अशा प्रकल्प सल्ला विभागाची २३ जुलै २००३ रोजी स्थापना झाली.

या विभागामार्फत वेगवेगळ्या प्रकारच्या सेवा देण्यात येतात. सहकारी संस्था, बाजार समित्या, खाजगी उद्योग यांना सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन देणे. पणन संचालनालयाकडील प्राप्त प्रस्तावांवर अभिप्राय अहवाल देणे या सारख्या सेवा या अंतर्गत पुरविण्यात येतात. तसेच पणन मंडळामार्फत उभारण्यात येणा-या सुविधांचे प्रकल्प अहवाल अनुदानाकरिता तयार करुन रा.कृ.वि.योजना व अपेडा यांना सादर करण्यात येतात.

प्रकल्प सल्ला विभाग सद्यस्थितीत कृषि प्रक्रिया प्रकल्पांना सल्ला सेवा पुरवित आहे. अशा सर्व प्रकल्पाची एकूण अदांजित किंमत सुमारे रु.२४० कोटी आहे.

**२) राज्यातील नियोजित प्रकल्प :**
आर.के.व्ही.वाय. अंतर्गत खालीलप्रमाणे २ प्रस्ताव सादर करण्यात आले.

१. राज्यातील १०८ बाजार समितींमध्ये गोदाम उभारणी प्रकल्प किंमत रु. १०९.८३ कोटी
२. राज्यातील ३१ बाजार समितींमध्ये धान्य चाळणी यंत्र उभारणी प्रकल्प किंमत रु. २०.२१ कोटी

**३) टर्मिनल मार्केट :**
केंद्र शासनामार्फत सार्वजनिक व खाजगी भागीदारी संकल्पनेतून टर्मिनल मार्केटस मुंबई((ठाणे), नाशिक व नागपूर या ठिकाणी उभारण्यात येणार आहेत._या प्रकल्पांचा अंदाजित प्रकल्प खर्च खालील प्रमाणे आहे.

| **अ.क्र** | **टर्मिनल मार्केट** | **अंदाजीत खर्च (रु. कोटी)** |
|---|---|---|
| १ | मुंबई( (ठाणे) | २००-२५० |
| २ | नाशिक | ६० |
| ३ | नागपूर | ७० |

राज्यात उभारण्यात येणा-या टर्मिनल मार्केटसच्या अंमलबजावणीकरिता मा. पणन मंत्री महोदयांचा अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली. मा.प्रधान सचिव (सहकार व पणन) हे नोडल ऑफिसर व राज्याचे पणन संचालक हे अतिरिक्त नोडल ऑफिसर म्हणून कामकाज पहात आहेत. प्रस्तावित टर्मिनल मार्केट हे सार्वजनिक खाजगी भागीदारीतून उभारण्यात येणार असून हब आणि स्पोक संकल्पनेवर चालविली जाणार आहेत. प्रस्तावित टर्मिनल मार्केटस (Built Own and Operate) या धर्तीवर स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेतून निवडलेल्या खाजगी उद्योजकाकडून चालविले जाणार आहेत. टर्मिनल मार्केटकरिता राष्ट्रीय फलोत्पादन अभियानातून प्रकल्प खर्चाच्या २५ ते ४० टक्के परंतु कमाल रु. ५० कोटी इतके अनुदान प्राप्त होऊ शकते.

**मुंबई टर्मिनल मार्केट :**
ऑगस्ट २००९ मध्ये ग्लोबल टेंडर नोटीसीद्वारे सुरु केलेली खाजगी भागीदार निवडीची प्रक्रिया राज्य शासनाने रद्द केलेली आहे. दरम्यान बाबगाव येथील जागा विकसीत करणेबाबतचे संकल्पना सादर करणेकरीता वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेत आली.

**नागपुर टर्मिनल मार्केट :**
नागपुर टर्मिनल मार्केट करीता मोजे कालडोंगरी येथील १०० एकर जागा ताब्यात घेतली आहे व त्याबाबत दि. ४.८.२०१७ रोजी शासनाबरोबर करारनामा केला आहे. दि. २१.८.२०१७ रोजी राज्य शासनास दि. ७.७.२०१६ रोजीच्या शासन निर्णयात बदल करणेबाबत विनंती केली आहे.

**नाशिक टर्मिनल मार्केट :**
दिनांक ०८ मार्च २०१८ रोजी नाशिक येथे टर्मिनल मार्केट उभारणीसाठी शासन मालकीची पिंप्री सय्यद (ता. नाशिक) येथील गट क्र. १६२१ व १६५४ मधील १०० एकर जमीन महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळास विनामूल्य हस्तातंरीत करण्याबाबत मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे तथापि याबाबतचा शासन निर्णय प्रतिक्षाधीन आहे.

## ड) अभियांत्रिकी विभाग

**अहवाल वर्षामध्ये २०१७-२०१८ मध्ये अभियांत्रिकी विभागामार्फत करण्यात आलेल्या विविध कामकाजाबाबतची माहिती पुढील प्रमाणे :-**

**अ)** कृषि उत्पन्न बाजार समित्यांना त्यांच्या बाजार आवारातील विविध विकास कामे / बांधकामे जसे कार्यालय, गोदाम, लिलाव ओटे, लिलाव गृह, रस्ते, स्वच्छता गृहे, पाणी पुरवठा, जल नि:सारण व्यवस्था व्यवस्था, व्यापारी गाळे, शेतकरी निवास, गुरांचे शेड, सीमाभिंत, तारेचे कुंपण, हमाल भवन, शितगृहे तसेच केंद्र शासनाच्या बाजार आवार विकास बळकटीकरण योजनेअंतर्गत बाजार आवारातील विविध विकासकामे इत्यादींच्या उभारणीसाठी पणन मंडळाकडे येणा-या कर्ज मागणी प्रस्तावांची त्या अनुषंगाने येणाऱ्या कर्ज विनियोग दाखला प्रस्तावांची तांत्रिक छाननीचे काम अभियांत्रिकी विभागामार्फत करण्यात येते.

**कृषी उत्पन्न बाजार समिती कर्ज प्रस्ताव छाननी :**

१) देऊळगाव राजा २) तळोदा ३) मंगळुर पीर ४) तुमसर ५) नायगाव ६) इंदापुर ७) कुर्डुवाडी ८) साक्री ९) उल्हासनगर १०) तासगांव

**ब) अपेडा, नवी दिल्ली / राष्ट्रीय कृषि विकास योजना अनुदान व पणन मंडळ स्वनिधी यानुसार पणन मंडळामार्फत उभारण्यात आलेले सुविधा केंद्रे :**

फुले निर्यात सुविधा केंद्र, सातारा, आधुनिक सुविधा केंद्र, करमाड, राजगुरुनगर, पुलगाव (वर्धा), लोणी, भिवापुर, पालघर, तळसंदे, म्हसवड इ.सुविधा केंद्राचे काम पुर्ण झालेले आहे. तसेच इरॅडिएशन प्रकल्प, वाशी येथील हॉट वॉटरचे काम, फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केद्र, घनसांगवी येथील विद्युत पुरवठा, निर्यात सुविधा केंद्र, कळवण येथील विद्युत पुरवठा करणे इ. काम पुर्ण करण्यात आली. केळी निर्यात सुविधा केंद्र, इंदापुर, तर इरॅडिशएन प्रकल्प वाशी येथील फर्निचरचे काम, विद्युतीकरण, सी.सी.टीव्ही चे काम तसेच विभागीय कार्यालय, औरंगाबाद येथील बांधकाम प्रगतीपथावर आहेत.

**क) राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत राज्यातील बाजार समित्यांसाठी राबविण्यात आलेले व नव्याने मंजूर झालेले प्रकल्प :**

**१) राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत विदर्भातील नक्षलग्रस्त जिल्ह्यांतील बाजार समित्यांचे पणन विषयक पायाभूत सुविधा प्रकल्प :**

सन २००९-२०१० मध्ये महाराष्ट्र राज्यातील जहाल डाव्या विचारसरणीने प्रभावित गडचिरोली, गोंदिया व चंद्रपूर या ३ जिल्ह्यांतील ११ बाजार समित्यांच्या बाजार आवारांमध्ये पणन विषयक पायाभूत सुविधा उभारणीसाठी रु. ३९.०२ कोटी किमतीचे प्रकल्पांना राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत मंजूरी दिलेली आहे. या ११ बाजार समित्यांच्या प्रकल्पांच्या अंमलबजावणीकरीता सनियंत्रण, मुल्यमापन व मार्गदर्शनाकरीता महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाची 'नोडल एजन्सी' म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

**या प्रकल्पांच्या उभारणीची उद्दीष्टे पुढीलप्रमाणे आहेत;**

- नक्षलग्रस्त जिल्ह्यांतील आदिवासी व इतर शेतक-यांना चांगल्या प्रकारच्या पणन सुविधा पुरवून त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे.
- आर्थिक स्थैर्यातून या भागातील सामान्य जनतेस नक्षलवादी चळवळीत सहभागी होण्यापासून परावृत्त करणे.
- हंगामात होणारी मोठ्या प्रमाणावरील शेतमालाची आवक अधिक कार्यक्षमपणे हाताळण्यास संबंधित बाजारपेठांना सक्षम करणे.
- संबंधित बाजार समित्यांच्या बाजार आवारांमध्ये आवश्यक स्वच्छता/आरोग्य राखून शेतमालाच्या सुगी पश्चात हानीमध्ये घट साध्य करणे.

या ११ बाजार समित्यांच्या प्रकल्पांचे कामकाज सन २०१०-२०११ मध्ये सुरु करण्यात आले होते. सद्यस्थितीत या ११ बाजार समित्यांच्या प्रकल्पांची कामे जवळपास पूर्ण झालेली आहेत. या ११ बाजार समित्यांना रु. २६.७७ कोटी अनुदान मंजूर असून आजअखेर रु. २३.९५ कोटी अनुदान राष्ट्रीय कृषि विकास योजनेमार्फत देण्यात आलेले आहे. या ११ बाजार समित्यांचे आवारामध्ये बाजार समिती स्वनिधी व रा.कृ.वि.यो. अनुदान यामधून आज अखेर एकूण रु. ३३.१७ कोटींच्या पायाभूत सुविधांची कामे करण्यात आलेली आहेत.

रा.कृ.वि.यो. अनुदान मंजुरीप्राप्त ११ बाजार समित्यांची बाजार समितीनिहाय मंजूर प्रकल्प किंमत, मंजूर अनुदान रक्कम व बाजार समितीला अदा अनुदान रक्कम याबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे :

**(रु. कोटी)**

| क्र. | कृषि उत्पन्न बाजार समिती | मंजूर प्रकल्प किंमत | मंजूर अनुदान रक्कम | बा.स.ला अदा अनुदान रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | चामोर्शी, जि. गडचिरोली | ९.९९ | ७.४९ | ५.६६ |
| २. | अहेरी, जि. गडचिरोली | २.३२ | १.७४ | १.६५ |
| ३. | गोरेगांव, जि.गोंदिया | २.६५ | १.३१ | १.३१ |
| ४. | तिरोडा, जि.गोंदिया | २.४० | १.४० | १.२५ |
| ५. | आमगांव, जि.गोंदिया | ४.७४ | ३.२५ | ३.२५ |
| ६. | गोंदिया, जि.गोंदिया | ७.०५ | ५.२९ | ४.६२ |
| ७. | अर्जुनी मोरगांव, जि.गोंदिया | २.३० | १.६० | १.५९ |
| ८. | कोरपना, जि.चंद्रपुर | १.१७ | ०.८८ | ०.८८ |
| ९. | सिंदेवाही, जि.चंद्रपुर | १.८२ | १.०५ | १.०५ |
| १०. | सावली, जि.चंद्रपुर | ३.२१ | १.८५ | १.७८ |
| ११. | पोंभुर्णा, जि.चंद्रपुर | १.३७ | ०.९१ | ०.९१ |
| | **एकुण** | **३९.०२** | **२६.७७** | **२३.९५** |

**२) सन २०१७-१८ अहवाल वर्षामध्ये कृषि पणन मंडळाने सादर केलेल्या खालील ४ नवीन प्रकल्पांना राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत मंजूरी देण्यात आलेली आहे.**

(रु. कोटी)

| अ.क्र. | प्रकल्पाचे नाव | प्रकल्प किंमत | मंजूर रा.कृ.वि.यो. अनुदान |
|---|---|---|---|
| १ | कृषि उत्पन्न बाजार समिती, कर्जत जि. अहमदनगर पायाभूत सुविधा विकास प्रकल्प | २.४६ | ०.६२ |
| २ | कृषि उत्पन्न बाजार समिती, जामखेड जि. अहमदनगर पायाभूत सुविधा विकास प्रकल्प. | ३.२३ | ०.८१ |
| ३ | राज्यातील ३१ बाजार समित्यांमध्ये प्रत्येकी २ मे टन प्रती तास क्षमतेची नवीन धान्य चाळणी यंत्र उभारणी करणे. | २०.२१ | ५.०५ |
| ४ | राज्यातील एकूण १०८ बाजार समित्यांमध्ये प्रत्येकी १००० मे. टन क्षमतेची एकूण १०८ गोदामे उभारणी करणे. | १०४.०९ | ९.४५ |

वरील प्रकल्पांपैकी गोदाम बांधकाम प्रकल्पासाठी केंद्र शासनाच्या ISAM COST NORMS नुसार रु. ८७५/- प्रती मे टन अनुदान मंजूर करण्यात आले आहे. सदर अनुदान सध्याच्या बांधकाम खर्चाच्या मानाने फक्त ९ % एवढे अल्प असल्याने ISAM COST NORMS नुसारच परंतु रु. ३५००/- प्रती मे टन (१०० %) अनुदान मिळावे यासाठी पणन मंडळाने राज्य तसेच केंद्र शासनाकडे विनंती केलेली आहे. उर्वरित ३ प्रकल्पांचे अंमलबजावणीसाठी शासन निर्णय व मार्गदर्शक सुचना जारी करणेसाठी पणन मंडळाने राज्य शासनाकडे विनंती केलेली आहे.

# इ) संगणक विभाग

- **मार्कनेट प्रकल्प:**

  मार्कनेट म्हणजे मार्केट नेटवर्क. या अंतर्गत कृषि पणन मंडळाने राज्यातील सर्व बाजार समित्या संगणकीकृत करुन इंटरनेटच्या माध्यमातून जोडल्या आहेत. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश बाजार समित्यांच्या आवारात येणाऱ्या शेतमालाच्या माहितीची (आवक व दर) देवाण-घेवाण करुन, शेतकऱ्याच्या शेतमालास रास्त भाव मिळवून देणे, तसेच बाजार समितीच्या कामकाजामध्ये सुसुत्रता आणणे हा आहे. या योजनेअंतर्गत राज्यातील २९४ मुख्य बाजार व ६६ उपबाजार यांना संगणक संच व तत्सम सामुग्री इंटरनेटसह विनामूल्य पुरविण्यात आली आहे. बाजार समितीमार्फत दैनिक शेतमालाची आवक व बाजारभाव संगणकामध्ये भरुन पणन मंडळाच्या वेबसाईटवर (www.msamb.com) अपलोड करण्यात येतात. याप्रमाणे सर्व संगणकीकृत बाजार समित्यांची माहिती वेबसाईटद्वारे एकत्रित करुन सर्वांना उपलब्ध करण्यात येते.

  राज्यातील सर्व बाजार समित्यांना कृषि पणन मंडळाची ई-मेल सुविधा पणन मंडळामार्फत विनामुल्य पुरविण्यात आली आहे. कृषि पणन मंडळ व बाजार समित्या यामधील पत्र व्यवहार व माहीती देवाण घेवाण या ई-मेल सुविधेद्वारे सुरू आहे. यामुळे माहीती देवाण घेवाणसाठी लागणा-या वेळेत व खर्चात बचत झाली आहे.

- **राष्ट्रीय कृषि बाजार (eNAM) योजना:**

  केंद्रशासनाने सुरु केलेल्या National Agriculture Market (eNAM) या योजनेअंतर्गत राज्यातील पहिल्या टप्प्यातील ३० बाजार समित्यांमध्ये संगणकीकृत लिलाव पद्धती (ई-ऑक्शन) कार्यान्वित करण्यात आली आहे. दुस-या टप्प्यातील ३० बाजार समित्यांमध्ये संगणकीकृत लिलाव पद्धती (ई-ऑक्शन) कार्यान्वित करणेबाबतची कार्यवाही सुरु आहे. यासाठी केंद्र शासनाच्या कृषि विभागाने बाजार समित्यांचे संगणकीकरणासाठी प्रति बाजार समिती रु. ३०/- लाख प्रमाणे निधी दिला आहे. योजनेच्या अंमलबजावणीठी रु.३०/- लाख व्यतिरीक्तचा खर्च बाजार समित्यांना करावा लागणार आहे.

  बाजार समित्यांमध्ये संगणकीकृत लिलाव पद्धती (ई-ऑक्शन) ची अंमलबजावणी एस.एफ.ए.सी. या केंद्र शासनाच्या संस्थेमार्फत करण्यात येत आहे. सदर संस्थेने योजनेच्या अंमलबजावणीसाठी सेवा पुरवठादाराची नियुक्ती केली आहे. नाम योजनेमध्ये समाविष्ट होणाऱ्या बाजार समित्यांना केंद्र शासनाकडून ई-ऑक्शन सॉफ्टवेअर, त्याची अंमलबजावणी, प्रशिक्षण, दुरुस्ती व देखभाल विनामुल्य पुरविण्यात येत आहे. पहिल्या टप्प्यातील ३० बाजार समित्यांनी संगणकाद्वारे नाम सॉफ्टवेअरचा वापर करुन गेट एन्ट्री व ई-ऑक्शन सुरु केले आहे. २८ बाजार समित्यांमध्ये शेतमाल तपासणी साठी असेईंग लॅबची उभारणी केली आहे. २४ बाजार समित्यांमध्ये शेतमालाचे असेईंग सुरु झाले आहे. ९ बाजार समित्यांनी ई-पेमेंट सुरु केले आहे. दुस-या टप्प्यातील ३० बाजार समित्यांनी संगणकाद्वारे नाम सॉफ्टवेअरचा वापर करुन गेट एन्ट्री सुरु केली आहे.

- **डेटा सेंटर :**

  संगणक विभागात स्वतंत्र टियर ३ पद्धतीचे डेटा सेंटर कार्यान्वित करण्यात आले आहे. या डेटा सेंटर मध्ये वेब, मेल, डेटाबेस, ई-ऑफीस, बाजार समित्यांच्या कामकाजासाठी पणन मंडळाने विकसीत केलेली ऑनलाईन संगणक प्रणाली, ईआरपी संगणक प्रणली, कॉम्पुटराईज्ड ऑक्शन सिस्टीम संगणक प्रणाली इत्यादी साठी सर्व्हर, स्टोरेज व बॅक-अप सुविधा कार्यरत आहे. इंटरनेट साठी २० एम.बी.पी.एस. ब्रॉड बॅन्ड व २० एम.बी.पी.एस. लिज्ड लाईन कार्यरत आहेत. डेटा सेंटर २४ x ७ कार्यरत असते.

- **ईआरपी संगणक प्रणाली :**

  कृषि पणन मंडळ व एन. आय. पी. एच. टी. यांचे कामकाजासाठी ईआरपी व एम.आय.एस. संगणक प्रणाली कार्यान्वित करण्यात आली असून त्या मध्ये विविध अहवाल विकसीत करण्यात आले आहेत. यामुळे माहितीचे एकत्रीकरण करणे सोयीचे झाले असून सविस्तर व संक्षिप्त अहवाल त्वरित प्राप्त होत आहेत.

- **डी.एम.आय. भारत सरकार यांचे कडून संगणक चालकास प्रोत्साहन भत्ता :**

  डी.एम.आय. भारत सरकार यांचे द्वारे Marketing Research & Information Network Scheme अंतर्गत अँगमार्कनेट वेबसाईटवर प्रत्येक महिन्याला २० दिवसांपेक्षा जास्त दिवस बाजारभाव माहिती भरणा-या कर्मचाऱ्यास रु.१०००/- प्रती माह प्रोत्साहन भत्ता देण्यात येतो. डि.एम.आय., भारत सरकार यांचे कडे प्रोत्साहन भत्ता मंजुरीसाठी प्रस्ताव पाठविण्यात येतात. आत्तापर्यंत रु.८६.२६/- लाख प्रोत्साहन भत्ता वाटप केला आहे.

- **सांख्यिकीय माहिती :**

  बाजार समित्यांकडून प्राप्त होत असलेले मासिक, वार्षिक बाजारभाव व आवक, तसेच बाजार समित्यांची इतर सर्वसाधारण माहिती संगणकामध्ये साठविणेसाठी व विविध अहवाल तयार करण्यासाठी डेटाबेस तयार करण्यात आला आहे. या डेटाबेस चा उपयोग करुन बाजार समित्यांचे उत्पन्न, खर्च, मार्केच फी तसेच वेब साईट डाटाबेसला उपलब्ध असलेली बाजार समित्यांमधील शेतमालाची आवक व किंमत याबाबत माहिती आवश्यकते प्रमाणे केंद्र शासन, राज्य शासन व इतर संबंधितांना वेळोवेळी पुरविण्यात येत आहे.

# ई) जनसंपर्क व प्रसिध्दी विभाग

**बाजार समिती पदाधिकारी / अधिकारी/शेतकरी प्रशिक्षण :**
कृषि पणन मंडळामार्फत राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे पदाधिकारी आणि अधिकारी यांना तसेच बाजार समित्यांमार्फत पाठविलेल्या शेतक-यांना कृषि पणन मंडळाने स्थापन केलेल्या राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था, तळेगाव दाभाडे, जि. पुणे या संस्थेत प्रशिक्षण देण्याचे काम करण्यात येते. दिनांक ०१/०४/२०१७ ते ३१/०३/२०१८ अखेर राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था, तळेगाव मार्फत हरीतगृह व्यवस्थापन,नर्सरी, शेड नेट, टिश्यू कलचर, बाजार समिती व्यवस्थापन, लॅन्ड स्केप या विषयाअंतर्गत एकूण १०३ प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आले व या प्रशिक्षणा अंतर्गत एकूण २६३६ प्रशिक्षणार्थिंना प्रशिक्षित करण्यात आले.

**पणन मित्र' मासिक :**
कृषि पणन मंडळामार्फत दर महिन्याला 'कृषि पणन मित्र' मासिक प्रसिध्द करण्यात येते. सदरचे मासिक प्रत्येक महिन्यास वर्गणीदार,कृषि उत्पन्न बाजार समिती, सहाय्यक निबंधक, जिल्हा उपनिबंधक, विभागीय सहनिबंधक, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, विभागीय कृषि अधिकारी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, जिल्हा परिषदा, पणन मंडळाचे संचालक मंडळ, मंत्रीमंडळ, मंत्रालयीन सचिव, वृत्तपत्रे, कृषि मासिके, इत्यादींना पाठविण्यात येते. अंकाचे जास्तीत जास्त वर्गणीदार करणेसाठी बाजार समिती, कृषि विभाग व सहकार विभागामार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच राज्यातील सर्व ग्रामपंचायती आणि विविध कार्यकारी सहकारी संस्था यांना वर्गणीदार करणेसाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.
सदर मासिकामध्ये कृषि उत्पादन, पिक संरक्षण, कृषी क्षेत्रातील उच्च तंत्रज्ञान, पाणी व्यवस्थापन, बी-बियाणे, प्रक्रिया उद्योग, पणन व निर्यात केंद्रे, राज्य शासनाच्या विविध योजना, सुगी पश्चात तंत्रज्ञान, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय, इ. विषयांवर तज्ञांचे लेख प्रसिध्द करण्यात येत असतात.

अहवाल वर्षात महिनानिहाय वितरीत अंकांची संख्या :

| अ.क्रं. | महिना | वितरीत अंक |
|---|---|---|
| १. | एप्रिल २०१७ | १३८८४ |
| २. | मे २०१७ | १३४९३ |
| ३. | जून २०१७ | १३०८३ |
| ४. | जुलै २०१६ | १००९९ |
| ५. | ऑगस्ट २०१७ | १२१७० |
| ६. | सप्टेंबर २०१७ | १२८४१ |
| ७. | ऑक्टोबर २०१७ | १३५०१ |
| ८. | नोव्हेंबर २०१७ | १४११३ |
| ९. | डिसेंबर २०१७ | १४७३० |
| १०. | जानेवारी २०१८ | १४४७६ |
| ११. | फेब्रुवारी २०१८ | १४९७० |
| १२. | मार्च २०१८ | १५४०७ |

अहवाल वर्षात कृषि पणन मित्र मासिकाचे सुमारे ३ लाख वाचक आहेत.

**दिनदर्शिका २०१८ व दैनंदिनी २०१८ :**

सन २०१८ मध्ये पणन मंडळाची दिनदर्शिका व दैनंदिनी छपाई करुन त्यांच्या प्रती मंत्रालय, राज्यातील बाजार समित्या व पणन मंडळातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना वितरीत करण्यात आल्या. कृषि पणन मंडळाच्या विविध उपक्रमांची माहिती लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी सदर दिनदर्शिकेचा, दैनंदिनीचा उपयोग होत आहे.

**प्रदर्शन/कार्यशाळा/चर्चासत्र/परीषद सहभाग :**

कृषी पणन मंडळाच्या विविध योजना, प्रकल्प, उपक्रम आणि कार्यक्रम यांची माहिती राज्यातील शेतक-यांना व्हावी व याचा फायदा जास्तीत जास्त शेतक-यांनी करुन घेण्याच्या दृष्टिकोनातून याबाबतची माहिती विविध प्रदर्शनामध्ये सहभागी होवून कृषी पणन मंडळातर्फे संबंधितांना देण्यात येते. तसेच सदर प्रदर्शनामध्ये कृषी पणन मित्र मासिकाचे जास्तीत जास्त वर्गणीदार करुन घेण्याचे प्रयत्न करण्यात येतात. चालू आर्थिक वर्षामध्ये कृषि प्रदर्शनासाठी झालेल्या खर्चास व नियोजित प्रदर्शन खर्चास मंजूरी घेण्यात आली. अहवाल वर्षात मंडळ खालील प्रदर्शनामध्ये सहभागी झाले;

| अ.क्रं. | प्रदर्शनाचे नांव | ठिकाण | कालावधी |
|---|---|---|---|
| १. | ॲग्री फूड बीज २०१७ कॉन्फरन्स | मुंबई | दि. ०६/०६/२०१७ |
| २. | कृषी पंढरी २०१७ | कृ.उ.बा.स., पंढरपूर | दि. ०१/०७/२०१७ ते ०६/०७/२०१७ |
| ३. | कांदा लसूण निर्यात: आव्हाने धोरणे | राजगुरुनगर | दि. १६/०९/१७ |
| ४. | वर्ल्ड फूड इंडीया २०१७ | दिल्ली | दि. ०३/११/२०१७ ते ०५/११/२०१७ |
| ५. | भारतातील कांदा व लसून यांत्रिकीकरण आव्हाने | राजगुरुनगर | दि. १०/११/२०१७ |
| ६. | कृषि साम्राज्य | कुउबास, पारनेर | दि. ०९/११/२०१७ ते १२/११/२०१७ |
| ७. | ॲग्रोव्हीजन ९ वे | रेशीम ग्राउंड, नागपूर | दि. १० ते १३ नोव्हेंबर २०१७ |
| ८. | कोकण विभागीय व कृषी फलोत्पादन प्रक्रिया उद्योग परीषद व प्रदर्शन | नांदगाव, ता. मुरुड जंजिरा | दि. १९/११/२०१७ |
| ९. | किसान २०१७ | मोशी, पुणे | दि. १३ ते १७ डिसेंबर २०१८ |
| १०. | ग्लोबल फार्मर लाईव्ह डेमोज, ॲग्रीकलचर एक्झीबिशन ॲन्ड क्रॉप कॉन्फरन्स २०१८ | कृषि विज्ञान केंद्र, नारायणगाव | दि. ०४ ते ०७जानेवारी २०१८ |

**प्रदर्शन / कार्यशाळा / परिषद आर्थिक मदत :**

आर्थिक वर्षामध्ये कृषि विषयक चर्चासत्र, प्रशिक्षण, प्रदर्शन आयोजित करण्यासाठी वेळोवेळी कृषि विद्यापिठे, कृषि विभाग, शास्त्रज्ञांच्या संस्था, कृषि उत्पन्न बाजार समित्या , कृषि पणनाशी संबंधित सहकारी संस्था यांच्याकडून पणन मंडळाकडे अर्थसहाय्य मिळणेबाबत विनंती केली जाते. पणन व्यवस्थेसंदर्भात प्रशिक्षण, प्रदर्शन, चर्चासत्र इत्यादींचे आयोजन करणे हे पणन मंडळाचे कार्य आहे. अशा प्रकारचे कामकाज इतर संस्था करीत असल्यास त्यांच्या चर्चासत्र, प्रशिक्षण, प्रदर्शन इत्यादींच्या आयोजनाकरीता कृषि पणन मंडळाकडून आर्थिक सहाय्य देणे कृषि पणन विषयक कामकाजांना गती देण्यासाठी आवश्यक आहे. या अनुषंगाने सन २०१६ सभा क्रं. १२२ मध्ये राज्यातील कृषि विद्यापिठे , विद्यापिठे, कृषि महाविद्यालये, कृषि विभाग, शास्त्रज्ञांच्या संस्था (असोसिएशन / सोसायटी) कृषि उत्पन्न बाजार समिती, कृषि पणनाशी संबंधित सहकारी

संस्था, कृषि क्षेत्र आणि कृषि पणन क्षेत्राशी निगडीत शासकीय, निमशासकीय संस्था यांना कृषि आणि कृषि पणन विषयक चर्चासत्र, कृतिसत्र, प्रशिक्षण, प्रदर्शन, इ. साठी येणा-या खर्चाच्या २५ टक्के किंवा जास्तीत जास्त रु. ५०,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम अर्थसहाय्य म्हणून देण्यात आली व यांबंधीचे निर्णय घेण्याचे अधिकार मा. कार्यकारी संचालक यांना देण्यात आले आहेत. तसेच सभा क्रं. १३२ ठराव क्रं. ३८ अन्वये उपरोक्त ठरावामधील अटी व शर्ती क्रं. ४ व ६ अन्वये अर्थसंकल्पामध्ये केलेल्या तरतुदीस अधीन राहून त्या आर्थिक वर्षात अर्थ सहाय्य देण्यात यावे व चर्चासत्र , कृतिसत्र, प्रदर्शन, प्रशिक्षण, यासाठी ऑरगनायझरला (एका अर्जदाराला) आर्थिक मदत रक्कम रु. ५००००/- पेक्षा जास्त देण्याबाबतचा प्रस्ताव असल्यास गुणवत्ता तपासून पणन मंडळाचे मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने अदा करावेत व नंतर तो संचालक मंडळ सभेपुढे कार्योत्तर मान्यतेसाठी ठेवण्यात यावा यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली या अनुषंगाने सन २०१७-२०१८ मध्ये खालील संस्थांना आर्थिक मदत देण्यात आली त्याचा तपशिल खालीलप्रमाणे;

| अ.क्रं. | संस्थेचे नांव/मासिकाचे नांव | विषय | रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १) | डाळिंब उत्पादक संशोधन संघ, पुणे | राष्ट्रीय परीसंवाद | ५०,०००/- |
| २) | MPK, राहुरी, महाराष्ट्र सोसायटी ऑफ ॲग्रीकलचरल इकॉनॉमिक्स, राहुरी | १९ वी वार्षिक आणि २ री आंतरराष्ट्रीय परीषद | ५०,०००/- |
| ३) | इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स, कलकत्ता | ॲग्री फूड बीझ २०१७ | २,००,०००/- |
| ४) | कृषी क्रांती क्लब, मंगळवेढा | भव्य ज्वारी मका परीषद | ३४,१२०/- |
| ५) | दि इंडियन सोसायटी ऑफ अलियम्स | कांदा व लसूण निर्यात : आव्हाने व धोरणे | ५०,०००/- |
| ६) | श्री स्वामी समर्थ कृषि विकास व संशोधन चॅरिटेबल ट्रस्ट | जागतिक कृषि महोत्सव २०१७ | ७५,०००/- |
| ७) | ॲग्रोव्हीजन फाउंडेशन , नागपूर | ॲग्रोव्हीजन ९ वे | १०,००,०००/- |
| ८) | कृषी उत्पन्न बाजार समिती, पंढरपूर | कृषी पंढरी २०१७ | ५०,०००/- |
| ९) | कृषी उत्पन्न बाजार समिती, पारनेर | कृषी साम्राज्य २०१७ | ५०,०००/- |
| १०) | महाॲग्रो , औरंगाबाद | महाॲग्रो २०१८ | ५०,०००/- |
| ११) | कृषी विज्ञान केंद्र, नारायणगाव | ग्लोबल फार्मर्स लाईव्ह डेमोज, ॲग्रीकलचर, एक्झिबेशन ॲन्ड क्रॉप कॉनफरन्स २०१८ | २५,०००/- |
| १२) | अखिल महाराष्ट्र डाळिंब उत्पादक संशोधन संघ, पुणे | राष्ट्रीय डाळींब परीसंवाद | ५०,०००/- |
| १३) | मी कांजूर प्रतिष्ठान | कोकण महोत्सव २०१८ | ५०,०००/- |
| १४) | नाशिक व्हॅली वाईन क्लस्टर | इंडिया ग्रेप हार्वेस्ट वाईन फेस्टीव्हल | ५०,०००/- |

**कृषि पणन मंडळ जाहिरात :**

कृषि पणन मंडळाची खालील मासिकांमध्ये व पोस्टाच्या कॅलेंडरसाठी जाहिरात देण्यात आली. मासिकांतील व पोस्टातील जाहिरातीमुळे पणन मंडळास विविध भागातून उदा. ग्राम पातळीवर, शहर पातळीवर प्रसिध्दी मिळते तसेच पणन मंडळाच्या योजनांची माहिती लोकांपर्यंत पोहोचते.

| अ.क्र. | संस्थेचे / मासिकाचे नाव | विषय | रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १. | साप्ताहिक दलप्रभा | विकास गौरव विशेषांक | ५०,०००/- |
| २. | किसान डायरी २०१७ | डायरी | २५,०००/- |
| ३. | लोकराज्य | जून २०१७ | ५०,०००/- |
| ४. | दै. जनशक्ती | विशेष वर्धापन दिन पुरवणी अंक | २५,०००/- |
| ५. | दै. पुण्यनगरी | दिवाळी विशेषांक २०१७ | ८०,०००/- |
| ६. | रोखठोक | दिवाळी विशेषांक २०१७ | ३५,०००/- |
| ७. | दै. श्रमिक एकजूट | दिवाळी विशेषांक २०१७ | ८,०००/- |
| ८. | अनिता दिपोत्सव | अनिता दिपोत्सव २०१७ | ५०,०००/- |
| ९. | अमृतवेल गव्हर्नन्स - मासिक | दिपावली विशेषांक २०१७ | २५,०००/- |
| १०. | मृगधारा - मासिक | दिपावली विशेषांक २०१७ | २०,०००/- |
| ११. | नई गस्त टाईम्स - साप्ताहिक | दिवाळी विशेषांक २०१७ | १०,०००/- |
| १२. | दै. देशोन्नती | दिवाळी विशेषांक २०१७ | ९०,०००/- |
| १३. | दि. पुणे पोस्ट ॲन्ड टेलिकॉम कॉ-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पुणे | कॅलेंडर २०१८ | ४,५००/- |
| १४. | दै. सामना | २३ जानेवारी २०१८ विशेषांक | १३,४४०/- |
| १५. | दै. लोकमान्य सांजवार्ता | वर्धापन दिन दैनिक | ५,२००/- |
| १६. | दै. पुढारी | वर्धापन दिनानिमित्त व्हिजन न्यू इंडीया विशेष पुरवणी | २६,३२०/- |
| १७. | दै. आपला वार्ताहर | वर्धापन दिन विशेषांक | २०,०००/- |

**प्रसिद्धी :**

कृषि पणन मंडळातर्फे विविध प्रकारच्या कार्यशाळा, प्रदर्शन, चर्चासत्र, इतर अनुषंगिक कार्यक्रम व पत्रकार परिषद आयोजित केल्या जातात. मा. अध्यक्ष कृषि पणन मंडळ यांच्या पत्रकार परिषद, प्रेसनोट तसेच इतर प्रसिध्दीचे कामकाज करण्यात येते.

**लेख प्रसिध्दी :**

लेख प्रसिध्दी – कृषि पणनाशी संबंधित माहिती शेतकरी, सह. संस्था, शास्त्रज्ञ, अधिकारी, पदाधिकारी, विस्तार कार्यकर्ते यांचेमार्फत पोहोचविण्यासाठी कृषि पणन मंडळ सतत प्रयत्नशिल आहे. कृषी पणनाशी संबंधित माहितीवर आधारित विविध लेख अहवाल वर्षात प्रसिध्द करण्यात आले आहेत.

**दूरदर्शन आणि आकाशवाणी कार्यक्रमात सहभाग :**

कृषि पणन मंडळ, दूरदर्शन, मुंबई व पुणे, आकाशवाणी पुणे केंद्राच्या ग्रामीण कार्यक्रम सल्लागार समितीचे सदस्य आहे. दूरदर्शन केंद्र, पुणे व मुंबई, आकाशवाणी पुणे केंद्रावरुन तसेच इतर आकाशवाणी केंद्रावरुन कृषि पणन मंडळाचे विविध कार्यक्रम, योजना, उपक्रम यांची माहिती तसेच शेतक-यांना कृषि तंत्रज्ञानाची माहिती होण्याच्या दृष्टिकोनातून पणन मंडळाच्या तज्ञांचे कार्यक्रम प्रसारीत करण्यात येतात. तसेच प्रत्येक तिमाहीसाठी विषय आणि तज्ञांची नावे कळविण्यात येतात. या कार्यक्रमांमुळे शेतक-यांना कृषि पणन मंडळाच्या योजना व कृषि विषयक मार्गदर्शन मिळण्यास मोठ्या प्रमाणावर मदत झालेली आहे.

सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षामध्ये दूरदर्शन, मुंबई व दूरदर्शन केंद्र, पुणे वरुन "कृषि दर्शन" या कार्यक्रमाअंतर्गत पणन मंडळाचे खालील अधिका-यांचे कार्यक्रम प्रसारित करण्यात आले;

| अ.क्रं. | अधिका-याचे नांव व पदनाम | विषय | कार्यक्रम प्रसारण दिनांक | दूरदर्शन केंद्राचे नांव |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. दिपक शिंदे | शेतमाल तारण योजना | १४/०३/२०१८ | वरळी, मुंबई |
| २. | श्री. सतिश व-हाडे | आंबा निर्यात | १६/०१/ २०१८ | वरळी, मुंबई |
| ३. | श्री. जे.जे. जाधव | शेतकरी आठवडे बाजार | १२/०१/२०१८ | वरळी, मुंबई |

**ग्रंथालय :**

कृषि पणन मंडळातील अधिकारी / कर्मचारी तसेच पणन मंडळाशी संबंधित सर्व संस्था, तज्ञ, शास्त्रज्ञ, विस्तार कार्यकर्ते, पदाधिकारी यांना कृषी, पणन, आयात, निर्यात,तंत्रज्ञान, नवीन संशोधन इ. बाबतची नवनवीन माहिती / संशोधन/ जागतिक घडामोडी समजाव्यात, त्याचा तपशिल प्राप्त व्हावा यासाठी ग्रंथालय सुरु करण्यात आले आहे. ग्रंथालयात विविध विषयांवरील पुस्तके, संशोधनपर मासिके, अहवाल, सी. डी., प्रकल्प अहवाल इ. उपलब्ध असून त्यांचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे.
तसेच दरवर्षी विविध विषयांवरील पुस्तके ग्रंथालयात येत असून कृषि पणन, निर्यात इ. विषयांवरील राष्ट्रीय आणि आतंरराष्ट्रीय स्तरावरुन प्रसिध्द होणारी मासिके, त्रैमासिके, नियतकालिके ग्रंथालयात येतात.

**ग्रंथालयातील पुस्तकांची सद्दस्थिती**

एकूण पुस्तके – ३,९९५
मासिके : मराठी – ५ व इंग्रजी – २

ग्रंथालय नवनवीन पुस्तकांची खरेदी करुन अधिकाधिक माहितीपूर्ण आणि आधुनिक करण्याचा सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहे. तसेच विविध विषयांवरील वृत्तपत्रांमध्ये / मासिकांमध्ये प्रसिध्द झालेल्या लेखांचे विषयावार संकलन ग्रंथालयात करण्यात येते. इंटरनेटवरुनही विविध विषयांवरील माहिती आवश्यकतेनुसार पणन मंडळातील अधिका-यांना उपलब्ध करुन देण्यात येते. ग्रंथालय विभागामार्फत मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अॅन्ड अॅग्रीकल्चर इ. विविध संस्थांचे सभासदत्व प्राप्त करुन घेण्यात आले आहे. ग्रंथालयात दररोज १० दैनिके येत असून या दैनिकांमधून विविध विषयांवरील कात्रण काढून त्यांचेही विषयावर संकलन करण्यात येते. तसेच सदर कात्रणांच्या प्रती व्हॉटस अॅप तसेच ई-मेल व्दारे संबंधितांना पाठविण्यात येतात. यामुळे कृषी पणन विषयक वृत्तपत्रांमधून आलेल्या बातम्यांची माहिती वरिष्ठांना होण्यास तसेच उपस्थित बाबींवर आवश्यक कार्यवाही करण्यास मदत होत आहे.

# प) कृषि व्यापार विकास विभाग

पणन व्यवस्थेत शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने योग्य तो बदल घडवून आणण्यासाठी, शेतकऱ्यांना जास्तीत जास्त आर्थिक मोबदला मिळवून देण्यासाठी नविन पर्याय निर्माण करणे, पणन व्यवस्थेत अनेक पर्याय निर्माण करणे हे मुख्य उद्दिष्ट ठेवून राज्यातील कृषि मालाच्या विक्री व्यवस्थेतील मध्यस्थांची संख्या कमी करुन शेतकऱ्यांना त्यांच्या कृषिमालाला चांगला भाव मिळावा व चांगल्या प्रतीचा कृषि माल किफायतशीर दरामध्ये ग्राहकांना उपलब्ध व्हावा तसेच राज्यातील कृषि मालासाठी देशांतर्गत नवनवीन बाजारपेठा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने कृषि व्यापार विकास विभाग कामकाज करत आहे. त्याच बरोबर राज्यातील कृषि मालासाठी परराज्यातील बाजारपेठा उपलब्ध होण्यासाठी तसेच परराज्यातील कृषि माल शेतकरी उत्पादक कंपनीच्या माध्यामातून राज्यातील ग्राहकांना रास्त दरात उपलब्ध करुन देणेकरीता तसेच शेतकऱ्यांमध्ये बाजार पेठेच्या बदलत्या परिस्थितीनुसार आवश्यक तो बदल घडविणे, त्यांना प्रशिक्षण देणे, बाजारपेठेतील बदलत्या घडामोडींची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहचविणे इ. बाबत कृषि व्यापार विकास विभाग प्रयत्नशिल आहे.

**१) उत्पादक ते ग्राहक थेट विक्री योजना:**

कृषि मालाच्या विक्री व्यवस्थेतील मध्यस्थांची साखळी वगळून उत्पादकांना थेट ग्राहकाला दर्जेदार मालाची किफायतशीर दरांमध्ये विक्री करता यावी यासाठी कृषि पणन मंडळामार्फत उत्पादक ते ग्राहक थेट विक्रीचा अभिनव उपक्रम राबविण्यात येतो. या उपक्रमाअंतर्गत चालू आर्थिक वर्षात उत्पादक ते ग्राहक थेट विक्री योजनेअंतर्गत आंबा व संत्रा महोत्सवांचे आयोजन करण्यात आले होते.

- **आंबा महोत्सव**

पणन मंडळामार्फत दरवर्षी आंबा महोत्सवाचे आयोजन केले जाते. सन २०१७-२०१८ मध्ये दि.२६/०३/२०१७ रोजी कृषि पणन मंडळाच्या मुख्यालयाशेजारील अंतर्गत रस्त्यावर मा. मंत्री, सहकार, पणन व वस्त्रोद्योग तथा मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ यांच्या शुभ हस्ते आंबा महोत्सव २०१७ चे उद्‌घाटन करण्यात आले.

सन २०१७ मध्ये पणन मंडळामार्फत मुख्यालयाच्या रस्त्यावर आंबा महोत्सवासाठी ४५ स्टॉल उभारण्यात आले आहेत. साधारणपणे ६० ते ६५ आंबा उत्पादक शेतकऱ्यांना आंबा महोत्सवात सहभाग घेतला होता.सदर योजनेस ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळत असून ग्राहकांना उत्तम प्रतिचा नैसर्गिकरित्या पिकविलेला आंबा रास्त दरात उपलब्ध होत आहे. यामुळे शेतकऱ्यांबरोबर ग्राहकांचाही फायदा होत आहे. कृषि पणन मंडळामार्फत पुणे येथे बालगंधर्व रंगमंदिर व येरवडा मध्यवर्ती कारगृह येथे आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून कराड, इस्लामपूर, सोलापूर इ. शहरात आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

- **संत्रा महोत्सव**

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ दर वर्षी वेगवेगळ्या फळांच्या महोत्सवांचे आयोजन करीत असते आणि यामध्ये आंबा आणि संत्रा या फळाचा प्रामुख्याने समावेश असतो. राज्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना संत्र्याची थेट ग्राहकांना विक्री करता यावी तसेच ग्राहक अदा करीत असलेल्या रक्कमेतील जास्तीत जास्त वाटा शेतकऱ्याला प्राप्त व्हावा आणि उत्पादक आणि ग्राहक यांच्यामध्ये थेट खरेदी विक्री व्हावी तसेच ग्राहकांमध्येही संत्रा फळाची आवड निर्माण व्हावी या दृष्टीकोनातून कृषि पणन मंडळामार्फत संत्रा महोत्सवाचे करण्यात येते.

**२) फळ महोत्सव अनुदान योजना:**

कृषि मालाच्या विक्री व्यवस्थेतील मध्यस्थांची साखळी वगळून उत्पादकांना थेट ग्राहकाला दर्जेदार मालाची किफायतशीर दरांमध्ये विक्री करता यावी यासाठी कृषि पणन मंडळामार्फत उत्पादक ते ग्राहक थेट विक्रीचा अभिनव उपक्रम राबविण्यात येतो. उत्पादक ते ग्राहक थेट विक्री योजना राज्यातील जास्तीत जास्त ठिकाणी राबविली जावी यासाठी राज्यातील सहकारी संस्था / सहकारी संघ / बाजार समित्या / बचत गट यांना फळ महोत्सव आयोजनासाठी कृषि पणन मंडळामार्फत अनुदान देण्यात येते. सदर योजनेत अंशत: बदल करण्यात आलेला असून महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या उत्पादक ते ग्राहक थेट विक्री योजनेअंतर्गत फळ व धान्य महोत्सव हे राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्या, कृषी व पणनशी संबधित असलेल्या सहकारी संस्था, शासनाचे विभाग व संस्था व शेतकरी उत्पादक कंपन्या यांच्यामार्फत खालील अटी व शर्तीस अधीन राहुन आयोजीत करण्यास व अशा संस्थांनाच अनुदान देण्याबाबत मा. संचालक मंडळाने निर्णय घेतलेला आहे.

**लाभार्थी -** राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्या, कृषी व पणनशी संबधित असलेल्या सहकारी संस्था, शासनाचे विभाग व संस्था व शेतकरी उत्पादक कंपन्या.

**नियम व अटी** –

१. महोत्सवाचा कालावधी हा किमान ५ (पाच) दिवसांचा असावा.
२. महोत्सवास प्रतिस्टॉल रु.२,०००/- याप्रमाणे अर्थसहाय्य देय राहील.
३. महोत्सवामध्ये किमान १० व कमाल ५० स्टॉलसाठी अर्थसहाय्य देय राहील.
४. महोत्सवाच्या प्रचार व प्रसिध्दीमध्ये उदा. बॅनर्स, जाहिरात, बातम्या, बॅकड्रॉप, हँण्ड बिल्स, इ. मध्ये कृषि पणन मंडळाचा सहप्रायोजक म्हणून नामोल्लेख करणे आयोजक संस्थेवर बंधनकारक राहील.
५. कृषि पणन मंडळास महोत्सवामध्ये सहभाग घ्यावयाचा झाल्यास त्यासाठी आवश्यक स्टॉलची मोफत उपलब्धता करुन देणे आयोजकांवर बंधनकारक राहील.
६. आयोजक संस्थेला सभासदांना 'कृषि पणन मित्र' मासिकाचे वर्गणीदार करावे लागेल.
७. महोत्सव आयोजनापूर्वी कृषि पणन मंडळाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील.
८. महोत्सवाचा अहवाल आणि काही निवडक फोटो आमच्या मासिकामध्ये प्रकाशित करण्यासाठी पणन मंडळाकडे सादर करावेत.
९. महोत्सवातील कृषि मालाची प्रत, दर व इतर अनुषंगिक व कायदेशीर बाबींसाठी कृषि पणन मंडळ जबाबदार राहणार नाही, तथापी चांगल्या गुणवत्तेचाच माल विकणे शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी यांचेवर बंधनकारक राहील, याची खातरजमा करण्याची जबाबदारी आयोजकावर राहील.
१०. महोत्सव अनुदानासाठीचा प्रस्ताव अपूर्ण असल्यास व अटी, शर्तींची पूर्तता न केल्यास अनुदान देय होणार नाही.
११. महोत्सव हा फक्त उत्पादकांकरिता असल्याने त्यामध्ये व्यापाऱ्यांना सहभागी होता येणार नाही किंवा मार्केटमधुन आणुन मालाची विक्री करता येणार नाही, असे आढळून आल्यास आयोजकांना अनुदानासाठी अपात्र ठरविले जाईल.
१२. महोत्सवाकरिता इतर कोणत्याही शासकिय योजनेअंतर्गत अनुदान घेतल्यास या योजनेअंतर्गत अनुदान देय होणार नाही.
१३. उपरोक्त नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र रु.१००/- च्या स्टँप पेपरवर लिहून देणे बंधनकारक आहे.

**३) संत शिरोमणी श्री सावता माळी शेतकरी आठवडे बाजार अभियान -**
राज्यामध्ये "संत शिरोमणी श्री सावता माळी शेतकरी आठवडे बाजार अभियान" राबविण्याचा शासनाने निर्णय घेतलेला असून या अभियानासाठी महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांची समन्वय संस्था (Nodal Agency) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या संदर्भात शासनाने दि.१२ ऑगस्ट २०१६ रोजी शासन निर्णय क्र.:कृपमं/प्र.क्र.११९/२१ स अन्वये शेतकरी आठवडे बाजारासाठीची नियमावली तयार केली आहे. तसेच महानगरपालिका / नगरपालिका यांनी त्यांच्या कार्यालयाच्या आवारात त्यांच्या भाजीमंडईत तसेच नगरपालिका क्षेत्रात शेतकरी आठवडे बाजारास जागा उपलब्ध करुन देणेबाबत नगर विकास विभागाने शासन परिपत्रक क्र. संकिर्ण-२०१६/प्र.क्र.३५३/नवि-२०, दि.२४ ऑगस्ट २०१६ रोजी प्रसिध्द केले आहे.

कृषि पणन मंडळाने शेतकरी आठवडे बाजार ही संकल्पना राबविण्यास सुरवात केलेली असून मुंबई शहरामध्ये संत शिरोमणी श्री सावता माळी शेतकरी आठवडे बाजाराचे उद्‌घाटन रविवार, दि.१४ ऑगस्ट २०१६ रोजी विधान भवनाच्या पार्कींग क्र. ४ मध्ये मा. ना. श्री. देवेंद्रजी फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते करण्यात आले. शेतकरी बाजाराच्या संकल्पनेस मूर्त स्वरुपात आणण्यासाठी शेतकरी आठवडे बाजारासाठी कृषि पणन मंडळास विनामूल्य जागा उपलब्ध करुन देणेकरीता राज्यातील सर्व महानगरपालिकांना / नगरपालिका / कृषि विभाग तसेच शासनाचे विवध विभाग यांना प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत व त्या संदर्भातून जागा ताब्यात घेणेबाबतचा पाठपुरावा करण्यात येत आहे.

शेतकरी आठवडे बाजारासंदर्भात शेतकरी / शेतकरी गट / शेतकरी उत्पादक कंपनी यांच्यामध्ये जनजागृती करण्यासाठी जिल्हानिहाय बैठका आयोजीत करुन शेतकऱ्यांमध्ये बाजारपेठेच्या बदलत्या परिस्थितीनुसार आवश्यक तो बदल घडविणे, त्यांना प्रशिक्षण देणे, बाजारपेठेतील बदलत्या घडामोडींची माहीती शेतकऱ्यांपर्यंत पोहचविणे इ. कामे करण्याचे नियोजन आहे. राज्यातील सर्व शेतकरी आठवडे बाजारातील आठवड्यातील शेतमालाची एकूण विक्री अंदाजे १००० ते १५०० मे. टन होत असून एकूण उलाढाल रु.५.०० ते ६.०० कोटी प्रती आठवडा होत आहे.

**शेतकरी बाजार संकल्पना :**

- शेतकरी तसेच ग्रामिण महिला बचत गट यांनी उत्पादित केलेल्या मालाला थेट बाजार पेठ उपलब्ध करून देणे
- सर्व प्रकारचा भाजीपाला एकाच ठिकाणी ग्राहकांना उपलब्ध करून देणे
- शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी आणि उत्पादक सहकारी संस्था यांचा शेतमाल त्यांनी पुरस्कृत केलेल्या गटांमार्फत/ प्रतिनिधींमार्फत विक्री करणे.
- मध्यस्थ नसल्यामुळे ग्राहक अदा करीत असलेली रक्कम थेट शेतकऱ्यांस उपलब्ध
- मालाची हाताळणी कमी होत असल्याकारणाने सुगीपश्चात नुकसान कमी तसेच मालाचा दर्जा उत्तम राहतो
- शेतकरी आठवडे बाजाराची वेळ व ठिकाण निश्चित असल्याकारणाने शेतमाल काढणीचे आणि विक्रीचे नियोजन करणे शेतकऱ्यांना शक्य
- इलेक्ट्रॉनिक वजन काट्यामार्फत शेतमालाचे वजन. त्यामुळे ग्राहकांमध्ये वजनाबाबत विश्वास निर्माण करणे
- बाजार पेठेचा अंदाज येत असल्याने बाजारात आणावयाच्या मालाबाबत नियोजन करणे शक्य
- शंभर टक्के रोखीने व्यवहार
- कोणत्याही प्रकारच्या परवान्यांची आवश्यकता नाही
- ग्रामिण भागातील युवकांना चांगल्या अर्थार्जनाचा रोजगार उपलब्ध
- वाजवी भावामध्ये ग्राहकांना भाजीपाला उपलब्ध

**शेतकरी बाजाराचे फायदे :**
**शेतकरी**

- शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या आणि उत्पादक सहकारी संस्था यांचेमार्फत थेट ग्राहकांना शेतमाल विक्रीची संधी
- कृषि माल शेतातून थेट बाजारात येत असल्याकारणाने काढणी नंतरच्या होणाऱ्या नुकसानीत मोठी घट
- रोख स्वरूपात १०० टक्के मालाची रक्कम थेट शेतकऱ्याच्या हातात
- आपल्या मालाचा बाजार भाव ठरविण्याचा शेतकऱ्याला अधिकार
- अत्यंत कमी शेतमाल विक्री खर्च
- ग्राहक आणि शेतकरी यांच्यामध्ये सामंजस्य निर्माण होते
- ग्राहकांच्या मागणीनुसार मालाचा पुरवठा
- थेट विक्रीमुळे मध्यस्थांना मिळणारी रक्कम थेट शेतकऱ्याला प्राप्त
- बाजारात विक्री होणाऱ्या मालाचा अंदाज आल्याने भाजीपाला शिल्लक रहात नाही.

**ग्राहक**

- ताजा स्वच्छ शेतमाल थेट शेतकऱ्यांकडून उपलब्ध
- शेतकरी विक्री करीत असल्याकारणाने मालाच्या प्रती बाबत खात्री
- थेट शेतकऱ्यांशी संवाद होत असल्याकारणाने ग्राहक आपली गरज शेतकऱ्याला सांगू शकतात.
- थेट शेतकऱ्यांकडून शेतमाल खरेदीचे ग्राहकांना समाधान
- घराजवळ भाजीपाला बाजार पेठ उपलब्ध
- भाजीपाला खरेदीचे आठवड्याचे नियोजन करता येते
- एकाच छताखाली भाजीपाला, फळे, प्रक्रिया उत्पादने, ग्रामिण उत्पादने ग्राहकांना उपलब्ध
- शेतमालाचे वजन इलेक्ट्रॉनिक वजन काट्यामार्फत होत असल्याने ग्राहकांना वजनाबाबत विश्वास

**४) आंतरराज्य विक्री व्यवस्थापन**

राज्यात उत्पादित होणाऱ्या नाशवंत भाजीपाला आणि फळे यांच्या विक्री व्यवस्थेमध्ये शेतकरी उत्पादक कंपन्यांना मदत व मार्गदर्शन करणे अत्यंत गरजेचे आहे. याकरीता प्रामुख्याने देशातील १० ते १५ राज्यांमधील बाजार पेठांमध्ये शेतकरी उत्पादक कंपन्यांमार्फत थेट फळे आणि भाजीपाल्याचा पुरवठा केल्यास शेतकरी उत्पादक कंपन्यांना आपल्या सभासदांना काही प्रमाणात जादाचे भाव देणे शक्य होईल. यामध्ये पणन मंडळामार्फत देशातील ज्या राज्यांमध्ये महाराष्ट्रातून फळे आणि भाजीपाला व्यापाऱ्यांमार्फत पाठविण्यात येत आहे अशा राज्यामधील महत्वाच्या शहरांमधील बाजार पेठांचा अभ्यास करणे, तेथिल बाजार समित्यांशी संपर्क साधून कोणत्या प्रकारचा माल महाराष्ट्रातून त्या बाजार समित्यांमध्ये कोणत्या व्यापाऱ्याकडे येतो याबाबत अभ्यास करणे, बाजार समित्यांधील काही व्यापाऱ्यांशी राज्यातून त्या ठिकाणी पाठविण्यात येणाऱ्या शेतमालाच्या विक्री संदर्भातून चर्चा करणे आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांनाही आपला शेतमाल सदर व्यापाऱ्यांना थेट पाठविणे आणि याद्वारे शेतमालाच्या विक्री साखळीमध्ये होणारे नुकसान कमी करणे आणि बाजार खर्च कमी करणे याद्वारे शेतकऱ्याला जादाचे उत्पन्न शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या माध्यमातून देणे शक्य आहे

**आंतरराज्य व्यापाराअंतर्गत पणन मंडळाने केलेले कामकाज -**

१) आंतरराज्य व्यापार वृध्दीकरीता कृषि पणन मंडळाच्या प्रयत्नातून भीमघोड ॲग्रो प्रोड्युसर कंपनी ली., बाभुळसर, ता. शिरुर, जि. पुणे यांच्या मार्फत दि.०६/१०/२०१७ रोजी १३ शेतकऱ्यांचा २१४३० किलो कांदा (३९८ गोण्या) तर २६/१०/२०१७ रोजी २१५५० किलो कांदा चंदिगढ येथे विक्रीकरीता पाठविण्यात आला. सदर कांदा चंदिगढ येथील दुवा ट्रेडींग कंपनी यांचेकडे विक्री करण्यात आला.

२) सद्यस्थितीत आंतरराज्य व्यापार वृध्दीसाठी राज्यनिहाय एका प्रतिनिधीची कंत्राटी पद्धतीने कृषि पणन मंडळामार्फत नेमणुक करण्याचे कामकाज प्रगतीपथावर आहे.

**आंतरराज्य व्यापारवृध्दीसाठी करावयाचे कामकाज -**

आंतरराज्य व्यापाराचा कृषि पणन मंडळाचा यापुर्वीचा अनुभव लक्षात घेता, महा.एफ.पी.सी. यांना आंतरराज्य व्यापाराकरीता प्राधिकृत करुन महा.एफ.पी.सी. मार्फत इतर राज्यात व्यापार वृध्दीसाठी प्रयत्न करावेत असे वाटते. तसेच आंतरराज्य व्यापारवृध्दीसाठी खाली नमुद केल्याप्रमाणे कामकाज करणे अपेक्षित आहे.

१. देशातील १० ते १५ राज्यांमधील महत्वाची शहरे निवडून या राज्यांमधील बाजार पेठांचा अभ्यास करणे
२. निवड केलेल्या राज्यामधील कृषि पणन मंडळे / पणन संचालनालय / बाजार समित्या यांचेशी संपर्क साधून तेथील बाजार समित्यांमधील व्यापाऱ्यांबरोबर चर्चा करणे, व्यापाऱ्यांची निवड करणे व शेतमालाची विक्री करण्याबाबत कृति आराखडी तयार करणे
३. शेतकरी उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी व कृषि पणन मंडळाचे अधिकारी यांना निवडक राज्यांमध्ये बाजार पेठांचा अभ्यास करण्यासाठी पाठविणे.
४. विविध राज्यांमध्ये शेतमालाच्या विक्री व्यवस्थेमध्ये राज्य शासनाचा सहभाग असल्यास त्या यंत्रणांचा उपयोग करून शेतमालाची विक्री कशी करता येईल याबाबत प्रयत्न करणे
५. निवडक राज्यांमध्ये शेतमालाची विक्री व्यवस्था पाहणे तसेच येणाऱ्या मालाची प्रत तपासणे, शेतकरी उत्पादक कंपन्यांस विक्री नंतर पेमेंट पाठविणे, कोणत्या शेतमालाच्या संबंधात राज्याच्या बाजार पेठांमध्ये शेतमाल विक्रीस वाव आहे याबाबतचा अभ्यास करणे तसेच या राज्यांमधील मोठ्या कंपन्यांना शेतमालाची विक्री करणे याबाबत अभ्यास करून कृषि पणन मंडळास अहवाल सादर करणे इ. कामासाठी राज्यनिहाय एका प्रतिनिधीची कंत्राटी पद्धतीने कृषि पणन मंडळामार्फत नेमणुक करणे.(सद्यस्थितीत राज्यनिहाय एका प्रतिनिधीची कंत्राटी पद्धतीने कृषि पणन मंडळामार्फत नेमणुक करण्याचे कामकाज प्रगतीपथावर आहे)
६. मुख्यालयातून राज्यनिहाय एका प्रतिनिधीकडे जबाबदारी देवून सदर प्रतिनिधीने प्रत्येक महिन्याला संबंधित राज्याचा दौरा करणे.
७. कोणत्या ठिकाणाहून कोणता माल पाठविणे शक्य आहे, वाहतूकीचे साधन कोणते वापरावे, पेमेंट पद्धत, प्रतवारी तपासणीची यंत्रणा इ. बाबतचे कामकाज संबंधित शेतकरी उत्पादक कंपनीने/महा.एफ.पी.सी. ने करणे अपेक्षित आहे.

# फ) तळेगाव शेती विभाग

- कृषि पणन मंडळाच्या शेती विभाग, तळेगाव अंतर्गत १५० एकर जमिन क्षेत्र आहे. सदरचे क्षेत्र मुख्यफार्म व गिलबिल पट्टी असे दोन वेगवेगळया ठिकाणी असून मुख्यफार्म हे प्रक्षेत्र तळेगाव गाव भागास लागून आहे. आणि गिलबिल पट्टी हे प्रक्षेत्र मुंबई - पुणे महामार्गास लागून आहे.

- **गिलबिल पट्टी प्रक्षेत्र तपशील / मुख्यफार्म प्रक्षेत्र तपशील**

| **अ.क्र.** | **गिलबिल पटटी तपशिल** | **क्षेत्र (एकर)** |
|---|---|---|
| अ) | राष्टीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था | २८.०० |
| **ब**) | पदवीत्तर कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय व निर्यात सुविधा केंद्र | ०१.०० |
| क) | फळबाग लागवडी खालील क्षेत्र (आंबा,पेरु,नारळ व आवळा) | १२.०० |
| ड) | नाला, रस्ते, इमारत व पडीक क्षेत्र | ०९.०० |
| | **एकुण क्षेत्र** | **५०.००** |

- **फळबाग –**

सदर प्रक्षेत्रावर आंबा - १५४ झाडे, पेरु - ६५० झाडे, नारळ ३२ झाडे, आवळा - ४० झाडे अस्तित्वात आहेत. सदर फळबाग पैकी पेरु व आंबा फळझाडे फक्त पाणी पुरविण्याच्या अटीवर वार्षिक भाडेतत्वावर देण्यात आलेले असून पाच वर्षाचे भाडे रु ६,४३,८७७.०० अंतिम करण्यात आलेले आहे.

**मुख्यफार्म प्रक्षेत्र तपशील –**

| **अ.क्र.** | **मुख्यफार्म तपशिल** | **क्षेत्र (एकर)** |
|---|---|---|
| अ) | लागवडी योग्य क्षेत्र | ३०.०० |
| ब) | तलावाखालील क्षेत्र (पाण्याचे क्षेत्र – अंदाजे२७-२८ एकर) | ४१.०० |
| क) | मत्स्यतळी | ०१.०० |
| ड) | नाला, रस्ते, इमारत, पडीक क्षेत्र, मत्स्यतळी व न्यायालयीन बाब | २८.०० |
| | **एकुण क्षेत्र** | **१००.००** |

- मुख्यफार्मवरील अ.क्र. 'ब' तलावाखालील क्षेत्र (४१ एकर) मच्छिमारीसाठी मावळ तालुका मच्छिमार को-ऑप सोसायटी, तळेगाव यांना पाच वर्ष करारावर दिलेली असून पाचव्या वर्षाची सन २०१७ - २०१८ ची रक्कम रु.५८,०००/- प्राप्त झालेली आहे. अ.क्र. 'क' दोन मत्स्यतळी (१ एकर) मच्छिमारीसाठी श्री.सिकीलकर, तळेगाव यांना पाच वर्ष करारावर दिलेली असून चौथ्या वर्षाची सन २०१७ - २०१८ ची रक्कम रु.३४,०००/- प्राप्त झालेली आहे.
- मुख्यफार्मवरील लागवडी योग्य क्षेत्रावर पुर्वी प्रात्याक्षिक पिके ऊस व इतर पीके (भात,सोयाबीन, इ.) घेण्यात येत होती. या जमीनीवरील नगरपरिषद आरक्षण बाब (डि पी रस्ता सोमाटणे ते तळेगाव), जमीनीस कंपाउट करणे आणि तलावात येणारे दुषित पाणी बंद करणे इ.कारणाने पिक पध्दती मागील ५ वर्षापासून तुर्तास बंद आहे. नगरपरिषद, तळेगाव यांचेकडून दुषित पाणी तलावात न येता बाहेर काढणेसाठी बंद गटर काढणेचे कामकाज सरू झालेले आहे.

मुख्यफार्म येथील शेत जमीन लागवडीखाली आणण्यासाठी पाणी पाईपलाईन दुरुस्ती व जमीन क्षेत्रास कंपाऊड करणे. इ. कामकाजाबाबत मा.संचालक मंडळ मान्यतेनुसार कार्यवाही चालू आहे

# ६) इतर प्रकल्प

## १) जागतीक बँक सहाय्यीत - महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प (MACP)

**प्रस्तावना**

जागतिक बँक व महाराष्ट्र शासनाच्या वतीने महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प राबविला जात आहे. प्रकल्पाचा कालावधी जानेवारी २०११ ते ऑक्टोबर २०१८ असून या कालावधीत प्रस्तावित सर्व उपप्रकल्पाची पूर्तता करणे आवश्यक आहे. हा प्रकल्प राज्यातील ३३ जिल्ह्यांमध्ये राबविला जात आहे.

प्रकल्पाचा प्रमुख उद्देश 'महाराष्ट्र' राज्यातील शेतीची उत्पादकता वाढविणे, शेतमालास किफायतशीर भाव मिळवून देणे व त्यादृष्टीने शेतकऱ्यांचा बाजारपेठांमध्ये सहभाग वाढविणे हा आहे.  तसेच प्रकल्पाचे अन्य उद्देश खालीलप्रमाणे:-

- जिल्हा स्तरावरील कृषि विभागातील आत्मा कार्यालयाच्या वतीने शेतकरी, अधिकारी यांच्यासाठी प्रशिक्षण, कार्यशाळा, अभ्यासदौरे, पिक प्रात्यक्षिके इ.उपक्रमांचे आयोजन करुन नविन माहिती व तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहचवून त्यांची शेतीतील उत्पादकता वाढविणे.
- शेतमाल उत्पादनात विविधता आणून बाजारातील मागणीवर आधारित शेतमालाचे उत्पादन वाढविणे, तसेच शेती व शेतीपूरक व्यवसायामध्ये रोजगार संधी वाढविणे.
- शेती व शेतीपूरक व्यवसायामध्ये तसेच विक्री व्यवस्थेमध्ये खाजगी क्षेत्राचा सहभाग वाढविणे, जेणेकरुन स्पर्धात्मक वातावरण निर्माण होवून शेतमालास किफायतशीर भाव मिळण्यास मदत होईल.
- शेतमालामध्ये गूणात्मक सुधारणा होवून शेतमालाचे मुल्य वाढविणे, तसेच शेतमालावर प्राथमिक प्रक्रिया करणे, संघटित बाजार व्यवस्था निर्माण करणे, जेणेकरून जास्तीत जास्त फायदा शेतकऱ्यांना होईल यादृष्टीने प्रयत्न करणे.
- राज्यातील बाजार व्यवस्थेमध्ये नवनविन सुविधा निर्माण करणे, तसेच कार्यपध्दतीमध्ये धोरणात्मक बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्न करणे. त्यादृष्टीने राज्यातील निवडक कृषि उत्पन्न बाजार समित्या, आठवडी बाजार, जनावरांचे बाजार, शेळ्या-मेंढ्यांचे बाजार व वखार महामंडळाची गोदामे यामध्ये सुविधा निर्मितीद्वारे शेतमालास वाढीव भाव मिळेल यादृष्टीने प्रयत्न करणे.
- शेतकऱ्यांसाठी धान्ये व फळे-भाजीपाला या शेतमाल उत्पादनावर आधारित शेतकरी उत्पादक कंपन्यांची उभारणी, अशा कंपन्यांच्या कार्यक्षेत्रात शेतकरी सामुदायिक सेवा केंद्रांची उभारणी करुन शेतमालाची स्वच्छता, प्रतवारी, साठवणूक व विक्री या सुविधा निर्माण करुन पर्यायी बाजारपेठ साखळीतील दुवा निर्माण करणे.

प्रकल्पाचा आराखडा रु. ७०२.१८ कोटी असून महाराष्ट्र शासनाचा हिस्सा ७% व प्रकल्पाचा लाभ घेणाऱ्या संस्था उदा. ग्रामपंचायती, बाजार समित्या, शेतकरी उत्पादक कंपन्या यांचा हिस्सा २७% आहे.

प्रकल्पामध्ये राज्य शासनाचे कृषि पणन विभाग, कृषि विभाग व पशुसंवर्धन विभाग यांचा सहभाग आहे. मा. प्रधान सचिव-कृषि व पणन (महाराष्ट्र शासन) हे प्रकल्पाचे नोडल अधिकारी आहेत. प्रकल्पाचे राज्य, जिल्हा तसेच गाव पातळीवरील कामकाजामध्ये योग्य समन्वय ठेवला जावा व प्रकल्पाची यशस्वी अंमलबजावणी व्हावी यासाठी पुणे येथे प्रकल्प समन्वय कक्ष व सहभागी ३ शासन विभागांच्या अंमलबजावणी कक्षांची स्थापना केली असून सर्व कामकाज पुण्यातील मार्केट यार्ड येथील कार्यालयातून चालते. प्रकल्पांतर्गत कृषि व्यवसाय प्रोत्साहन सुविधा व भारतीय कृषि विपणन माहिती व विश्लेषण सेवा यंत्रणा स्थापित केल्या असून राज्यात शेती

व शेतीपूरक व्यवसाय वाढीस लागावेत व शेतकऱ्यांना बाजारभाव व अन्य आवश्यक माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने या यंत्रणा कार्यरत आहेत.

प्रकल्पांतर्गत पर्यावरण व सामाजिक विकास, संपादन, लेखा, बांधकाम, संनियंत्रण व मुल्यमापन, माहिती व्यवस्थापन, कार्यालयीन व्यवस्थापन असे विविध विभाग कार्यरत असून या विभागांमध्ये शासन सेवेतील व कंत्राटी पध्दतीने अधिकारी व कर्मचाऱ्यांची नेमणूक केली आहे. या प्रकल्पामध्ये शेतकऱ्यास थेट मदत होईल असे उपक्रम अत्यंत कमी असले तरीदेखील शेतमाल उत्पादन वाढविणे, शेतमाल बाजारपेठ सुधारणा करणे व शेतकऱ्यांनी संघटितरित्या विक्री व्यवस्था यावर भर असल्याने शेतकरी हा या प्रकल्पाचा केंद्रबिंदू आहे. प्रकल्पातील सर्व उपक्रमांची अंमलबजावणी सुरु असून प्रकल्पाचे काम अंतीम टप्प्यात आले आहे.

**प्रकल्पांतर्गत राबविलेले प्रमुख उपक्रम**

- आत्मा कार्यालय, वानामती, रामेती, पशुसंवर्धन विषयक प्रशिक्षण देणारी राज्यस्तरीय संस्था, राष्ट्रीय कृषि पश्चात तंत्रज्ञान संस्था (NIPHT) यासारख्या प्रशिक्षण संस्था तसेच ६६ शेतकरी सल्ला व मार्गदर्शन केंद्रांच्या बळकटीकरणासाठी सहाय्य.
- १३००० शेतकरी गटांची स्थापना व या गटांना गावसमुह (क्लस्टर) निहाय एकत्र आणून ४०६ शेतकरी उत्पादक कंपन्यांची स्थापना. तसेच सर्व कंपन्यांच्या कार्यक्षेत्रात शेतकरी सामुदायिक सेवा केंद्रांची निर्मिती केली असून नाशिक, धुळे व नंदूरबार जिल्ह्यात १५० आदिवासी शेतकरी गटांची निर्मिती केली आहे.
- निवडक जिल्ह्यातील शेळी-मेंढी पालकांचे गट तयार करणे व त्यांच्यासाठी जिल्हास्तरीय फेडरेशनची स्थापना करणे, तसेच शेळीपालन एक उच्च्यमुल्यवर्धित व्यवसाय प्रात्यक्षिकांद्वारा उस्मानाबादी बंदिस्त शेळीपालनास चालना दिली आहे.
- पिक प्रात्यक्षिके, चारापिक प्रात्यक्षिके, काढणी पश्चात तंत्रज्ञान प्रात्यक्षिके, शेतकरी व अधिकाऱ्यांसाठी कृषि व विपणन विषयक क्षमता बांधणी कार्यक्रमांचे आयोजन.
- ८१ कृषि उत्पन्न बाजार समित्या, ४७० आठवडीबाजार, २० जनावरांचे बाजार, ०४ शेळया-मेंढ्यांचे बाजार, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या २३६ गोदामांमध्ये बांधकामे व अन्य सुविधांची निर्मिती.
- कृषि व कृषि पूरक व्यवसाय वाढावेत यादृष्टीने अल्प व अत्यल्प भूधारक, युवक, महिला यांना प्रकल्प उभारणीसाठी मार्गदर्शन, त्यांच्यासाठी कार्यशाळांचे आयोजन, तसेच अशा प्रकारचे उद्योग उभारणीसाठी कृषि उद्योजकता कार्यक्रमांतर्गत भरीव आर्थिक सहाय्य.
- कृषि व्यवसाय प्रोत्साहन सुविधा यंत्रणा व भारतीय कृषि विपणन माहिती व विश्लेषण सेवा यंत्रणांची प्रकल्पांतर्गत स्थापना व कार्यवाही.
- पर्यावरण व सामाजिक व्यवस्थापनाच्या दृष्टीने विविध उपाययोजनांचा अवलंब. महिला- आदिवासी व अन्य मागास जाती-जमातींचा समावेश व्हावा यासाठी कार्यशाळा, पथदर्शी प्रकल्पांची अंमलबजावणी. नियमीत क्षेत्रीय भेटीतून पाठपूरावा.
- निवडक जिल्ह्यांमध्ये महिला ग्रामसंपर्क कार्यकर्तीची (पशुसखी) नेमणूक, त्यांचे पशुसंवर्धन विषयक सखोल प्रशिक्षण, गावस्तरावर पशुसंवर्धन विषयक सेवा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने पशुसखी कार्यरत.

**प्रमुख उपक्रमांचा तपशील**

**१) शेतकरी सामुदायिक सेवा केंद्र उपक्रम**

शेतकरी सामुदायिक सेवा केंद्र हा एक महत्वपूर्ण उपक्रम प्रकल्पांतर्गत राबविला जात आहे. सुरूवातीच्या टप्प्यात शेतकरी सामुदायिक सेवा केंद्रासाठी केवळ प्राथमिक सुविधा निर्मितीसाठी व दुस-या टप्प्यात निवडक

पात्र केंद्रांना उत्पादक सुविधा निर्मितीसाठी प्रकल्पांतर्गत सहाय्य केले जाते. खाली दिलेली यादी ही सूचक असुन शेतकरी उत्पादक कंपन्यांनी गरजेनुसार आवश्यक सुविधांची निवड करावी.

शेतकरी सामुदायिक सेवा केंद्र (अन्न धान्ये) साठी गोदाम, स्वच्छता - वर्गीकरण व पॅकींग मशिनरीसह शेडचे बांधकाम, पॅकींगसाठी साहित्य, इतर आवश्यकतेनुसार लागणारी उपकरणे यासाठी सहाय्य केले जाते. तसेच शेतकरी सामुदायिक सेवा केंद्र (फळे व भाजीपाला) यासाठी पॅकहाऊस, प्लॅस्टिक क्रेटस, फळे व भाजीपाला वर्गीकरण व पॅकींग करण्यासाठीची सुविधा, इतर आवश्यकतेनुसार लागणारी उपकरणे यासाठी सहाय्य केले जाते.

या दोन्ही प्रकारच्या केंद्रांमध्ये शेतकरी सामुदायिक सेवा केंद्राचा स्वहिस्सा २५% म्हणजेच रू. ४.५ लक्ष असून प्रकल्पाच्या वतीने रु. १३.५० लक्ष निधी अनुदान स्वरुपात उपलब्ध केला जातो.

प्रकल्पामध्ये प्रत्येक जिल्ह्यात सरासरी १२ ते १४ उत्पादक कंपन्या याप्रमाणे राज्यात एकूण ४०६ कंपन्या स्थापन केल्या असून यामध्ये प्रत्येकी सरासरी पाच ते सात गावातील शेतकरी सहभागी आहेत. वर उल्लेख केल्यानुसार या कंपन्या विशिष्ट शेतमालावर आधारित काम करणे अपेक्षित असून, त्यादृष्टीने शेतमालाची साठवणूक, स्वच्छता, प्रतवारी यासारखी प्राथमिक प्रक्रिया करण्यासाठी आवश्यक ती मशिनरी व साधारणत: १५०० चौ.फूटाचे शेडचे बांधकाम या कार्यक्रमांतर्गत करुन दिले जाते.

शेतकरी गटांना एकत्र करुन शेतकरी उत्पादक कंपन्यांची स्थापना करणे, अशा कंपन्यांची नोंदणी करणे, निवडलेल्या संचालकांची क्षमता बांधणी करणे, शेतकरी सामुदायिक सेवा केंद्राचा प्रकल्प मर्यादेत व्यवसाय आराखडा तयार करणे व व्यवसाय आराखड्यानुसार प्रत्यक्ष कार्यवाही करणे या सर्व कामासाठी प्रकल्पाच्या वतीने तज्ञ सेवा पुरवठादार संस्थांची नेमणूक केली आहे. या संस्थांच्या मार्गदर्शनाखाली सर्व कामे केली जात असून या कंपन्यांची प्रगतीशील वाटचाल होईल अशी खात्री आहे.

## २) कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे आधुनिकीकरण

केंद्र व राज्य शासनाचा शेतमाल उत्पादनाबरोबरच सक्षम बाजार व्यवस्था निर्माण व्हावी यावर भर असून बाजार समित्यांनी धोरणात्मक बाबींचा अवलंब व विशेषत: केंद्र शासनाच्या मॉडेल ऍ़क्ट मधील तरतूदींचा अवलंब करावा यासाठी प्रयत्न केला जात आहे. या प्रकल्पामध्ये राज्यातील ८१ बाजार समित्यांची काही निकषांवर आधारित निवड केली असून या बाजार समित्यांमध्ये पायाभूत व उत्पादक सुविधांची निर्मिती केली जाते. या सुविधांमध्ये खुले लिलाव ओटे, गोदामे, स्वच्छता व प्रतवारी यंत्रणा,स्वच्छतागृह, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, अंतर्गत रस्ते, इलेक्ट्रॉनिक वे ब्रिज, शेतकरी भवन, सांडपाणी व्यवस्थापन, ह्यूम पाईप्स, कँटीन, सुरक्षा रक्षक केबीन, संरक्षक भिंती यासारखी बांधकामे केली जातात.

बाजार समित्यांच्या एकंदर कामकाजात सुधारणा व्हावी यादृष्टीने बाजारभाव दर्शविणारे स्वयंचलित फलक, शेतमालाच्या संगणकीय लिलाव पध्दतीस चालना देणे, सर्व बाजार समित्यांची सारखी लेखा पध्दती असावी यादृष्टीने त्यांनी टॅलीचा अवलंब करावा यासाठी चालना देणे यासारखे उपक्रम राबविले आहेत. तसेच प्रकल्पाचे स्वतंत्र संकेतस्थळ, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाचे डाटा सेंटर अद्यावत करणे यासारखी कामे हाती घेतली आहेत.

प्रकल्पांतर्गत बाजार समितीच्या वतीने कार्यरत २० जनावरांचे बाजार व ०४ शेळ्या-मेंढ्यांच्या बाजारांची निवड केली असून या बाजारात जनावरांसाठी लिलावगृहे, जनावरे वाहनात चढविणे-उतरविणेसाठी रँप्स, नागरिकांसाठी व जनावरांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, घनकचरा व्यवस्थापन, जनावरे बांधण्यासाठी व्यवस्था, शेतकरी निवारागृह, बाजार आवारात नैसर्गिक सावली निर्माण व्हावी यासाठी झाडांची लागवड यासारखी कामे केली जातात.

## ३) आठवडी बाजार सुधारणा

'आठवडी बाजार' ही ग्रामीण महाराष्ट्रात पारंपारिक व्यवस्था पंचक्रोशीतल्या सामान्य जनतेसाठी मीठ-मिरची पासून ते धान्य-भाजीपाला व इतर जिवनोपयोगी वस्तू खरेदी करण्यासाठी अत्यंत उपयोगी बाजारहाट व्यवस्था असून राज्यात साधारणत: ३५०० आठवडी बाजार ग्रामपंचायतींमार्फत भरविले जातात. बहुतांश बाजार हे गावाच्या मध्यवर्ती ठिकाणी किंवा प्रमुख रस्त्यांवर भरविले जातात. या बाजारांमध्ये मुलभूत सुविधांचा देखील अभाव दिसून येतो, असे असले तरी बाजार फी च्या माध्यमातून ग्रामपंचायतीला हुकमी व चांगले उत्पन्न मिळते. त्यामुळे आठवडी बाजार हा उत्पन्न मिळवून देणारा चांगला उपक्रम असल्याने ग्रामपंचायतीने विक्रेते व ग्राहक यांना सुविधा व सोई निर्माण करुन देण्याची गरज आहे.

प्रकल्पांतर्गत राज्यातील ४७० आठवडी बाजारांची काही निकषांच्या आधारे निवड करुन प्रकल्प मर्यादा रु. २५.०० लाख पर्यंत व त्यामध्ये १०% ग्रामपंचायत स्वहिस्सा याप्रमाणे सर्व बाजारातील कामे पूर्ण झाली असून, १९ बाजारांमध्ये उत्पादक सुविधा निर्माण करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. उत्पादक सुविधांमध्ये गोदाम, लिलावगृह, पॅकहाऊस यासारख्या सुविधा निर्माण केल्या जातात.

बांधकामे सुरु करण्यापूर्वी ग्रामपंचायतीचे पदाधिकारी, ग्रामस्थ व शेतकरी - व्यापारी प्रतिनिधींसोबत विचार विनिमय करुन बाजार आवारात कोणत्या सुविधा निर्माण करावयाच्या याची निश्चिती केली जाते. बाजार आवारात बाजार ओट्यांचे बांधकाम अथवा बाजार तळ सपाटीकरण, शेड, कुंपण, अंतर्गत व जोडरस्ते, पिण्याच्या पाण्याची सुविधा आणि महिला व पुरुषांसाठी शौचालय-मुतारीची व्यवस्था यासारख्या सुविधांची निर्मिती केली जाते. याची सर्व जबाबदारी संबंधित ग्रामपंचायतीची असल्याने प्रत्येक ग्रामपंचायत स्तरावर मा. सरपंच यांच्या अध्यक्षतेखाली एक आठवडी बाजार व्यवस्थापन समितीची स्थापना केली जाते. तसेच बांधकामासाठी ग्रामपंचायतीमार्फत कंत्राटदार नेमून जागतिक बँकेने सूचित केलेल्या सामुदायिक संपादन प्रक्रियेनुसार सर्व कामे केली जातात. तसेच बाजारातील बांधकामे चांगली व दर्जात्मक व्हावीत यासाठी आठवडी बाजार संपादन समितीची स्थापना केली जाते, ही समिती ग्रामपंचायतीस सहाय्य करते.

बाजारात निर्माण झालेल्या सोई-सुविधा या सातत्यपूर्ण वापरात राहाव्यात आणि त्यांची देखभाल-दुरुस्ती नियमीतपणे व्हावी यासाठी प्रकल्प किंमतीच्या १% म्हणजे रु. २५०००/- ची तरतूद करणे बंधनकारक आहे. प्रकल्पामार्फत नेमलेल्या तांत्रिक अधिकाऱ्याच्या मार्गदर्शनाखाली सर्व कामे केली जातात.

या बाजारातून बाजारओटे, शेडसहित बाजारओटे, शौचालये, पिण्याच्या पाण्यासाठी टाक्यांची बांधकामे, बाजार ओट्यांच्या मध्ये अंतर्गत रस्ते व काही ठिकाणी आधुनिक 'पेव्हर ब्लॉक्स' चा वापर करुन सुशोभीकरण, काही ठिकाणी बाजार नदी अथवा नाल्याच्या जवळ भरत असल्याने संरक्षित भिंतींचे बांधकाम, बाजार आवारात झाडांची लागवड केली आहे. या सुविधांमुळे बाजारातील धूळ-चिखल-माती, ऊन-पावसाचा त्रास, पिण्याचे पाणी व शौचालय-मुतारीची अव्यवस्था व एकंदरीत अस्वच्छता या सर्व गैरसोईंपासून बाजारात येणाऱ्या शेतकरी, विक्रेते व ग्राहकांची सुटका झाल्याचे चित्र दिसत आहे. तसेच निवडक ग्रामपंचायतींनी स्वत:च्या निधीतून गांडूळखत निर्मिती प्रकल्प, बाजारालगत वाहनतळ, सौरदिवे, हायमास्ट दिवे, ओट्यांवर शेडची व्यवस्था, झाडांची मोठ्या प्रमाणात लागवड इ. कामे हाती घेतली आहेत. उदाहरणादाखल मिरजगाव व निघोज (अहमदनगर), हिवरखेडा (अमरावती), नांदूरघाट (बीड), एटापल्ली (गडचिरोली), शहापूर (नांदेड), अनगर (सोलापूर), कणेरी मठ, महागाव, उचगांव, लाटवडे (कोल्हापूर), कुरळप, कासेगाव (सांगली), मांडवगण फराटा, पणदरे व रांजणगाव - गणपती (पुणे), नांदूर शिंगोटे (नाशिक), बोराडी (धुळे) आणि नागठाणे (सातारा) येथील कामे बाजार व्यवस्थेत अमुलाग्र बदल घडवून आणणारी व नाविण्यपूर्ण कामे झाली आहेत.

या कामांमुळे आठवडी बाजारांच्या वार्षिक लिलाव रक्कमेत सरासरी १५ ते २२ टक्के वाढ झाली असून प्रकल्पामधून झालेले हे काम पथदर्शक ठरले असून अन्य बाजारांची या धर्तीवर सुधारणा करण्याची गरज आहे.

## ४) धान्य तारण योजना

महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाची राज्यात १६.६० लक्ष मे.टन साठवणूक क्षमतेची १८७ वखार केंद्रे असून ८ विभागीय कार्यालयांमार्फत कामकाजाचे नियंत्रण केले जाते. शेतकऱ्यांसाठी अन्नधान्य साठवणूकीसाठी गोदामांमध्ये २५% राखीव जागा व साठवणूक भाड्यात ५०% सूट व १००% विमा संरक्षण असून नुकसान झाल्यास योग्य ती भरपाई दिली जाते. शेतकऱ्यांच्या हितासाठी राज्यातील लहान-मोठी गोदामे / शितगृहे ऑनलाईन सुविधांतर्गत जोडणी करुन गोदाम केंद्र स्तरावर शेतमाल साठवणूकीसह विपणनाची (मार्केटींग) मुलभूत सुविधा उपलब्ध केली आहे. वखार केंद्रांमध्ये साठवणूक केलेल्या शेतमालावर सवलतीच्या दरात कर्ज मिळण्यासाठी युको बँक, पंजाब नॅशनल बँक, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र, युनियन बँक ऑफ इंडिया या बँकांशी वखार महामंडळाचे सामंजस्य करार करण्यात आले आहेत. गोदामांमध्ये अन्नधान्याची गुणवत्तापूर्वक व शास्त्रोक्त पध्दतीने साठवणूक केली जाते. तसेच शेतकऱ्यांनी गोदामांमध्ये साठवणूक केलेल्या शेतमालाच्या किंमतीच्या ७५% पर्यंतचे अल्पमुदत कर्ज धान्य तारण पावतीच्या आधारे बँकेकडून मिळवून दिले जाते.

या प्रकल्पामधून शेतकऱ्यांना पर्यायी बाजारपेठ उपलब्ध व्हावी या उद्देशाने वखार महामंडळाच्या २३६ वखार केंद्रांची निवड करुन शेतमालाच्या योग्य साठवणूकीसाठी आधुनिक पध्दतीने गोदामाची तळजमीन, छत यांच्या दुरुस्त्या केल्या आहेत. तसेच वखार केंद्रांच्या कार्यक्षेत्रात शेतकऱ्यांसाठी जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करुन प्रकल्पांतर्गत सुविधा व सेवांबाबत मार्गदर्शन, तसेच राज्यातील एस.टी. महामंडळाच्या निवडक बसस्थानकांवर जिंगल्सद्वारे धान्यतारण योजनेची प्रसिध्दी केली आहे. प्रकल्प सहाय्यातून ४० वखारकेंद्रे व राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत ७२ वखारकेंद्रांमध्ये ई-वखार पावती संकल्पना राबविण्यासाठी आवश्यक संगणक साहित्य पुरवठा, तसेच इलेक्ट्रॉनिक स्पॉट एक्स्चेंजच्या माध्यमातून पर्यायी बाजारपेठ सुविधा निर्माण करण्यासाठी आवश्यक मुलभूत प्रयोगशाळाची स्थापना केली असून वखार महामंडळ व NeML (NCDEX e-Market Ltd.) यांच्याशी सामंजस्य करार केले आहेत. सर्व वखार केंद्रांचे वेअरहाऊसींग डेव्हलपमेंट अँन्ड रेग्युलेटरी ऍथॉरिटी (WDRA) यांच्याकडून ऍक्रिडेशन करणेसाठीचे सहाय्य केले आहे. राज्यातील अनेक शेतकऱ्यांनी या उपक्रमाचा लाभ घेतला आहे.

वखार महामंडळाच्या गोदामांमध्ये शेतकऱ्यांनी धान्याची साठवणूक करुन, धान्य तारण योजनेचा लाभ घेवून बाजारपेठांमध्ये धान्याच्या किंमती वाढल्यानंतर विक्री करावी व अधिक भावाचा लाभ घ्यावा या हेतूने हा उपक्रम राबविला आहे.

## ५) कृषि उद्योजकता विकास कार्यक्रम

नवनवीन पध्दती व तंत्रज्ञानाच्या वापरातून शेतमाल उत्पादन वाढ करणे, उत्पादित शेतमालाची गुणवत्ता व विक्रीमुल्य वाढविणे व बाजारपेठांशी जोडणीव्दारे शेतकऱ्यांच्या नफ्यात वाढ करणे या साठी हाती घ्यावयाच्या उद्योग/व्यवसायांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम राबविला जातो. लाभार्थी निवडीमध्ये नव उद्योजक, शेतकरी उत्पादक गट, शेतकरी उत्पादक कंपनी यांना प्राधान्य दिले जाते, तसेच नव्याने सुरु केलेल्या प्रकल्पांचाच सहाय्यासाठी विचार केला जातो.

अशा प्रकारचा उद्योग/व्यवसाय उभारणीसाठी आवश्यक मशिनरी वउपकरणे खरेदीसाठीच एकूण खर्चाच्या ५०% किंवा रु. १०.०० लाख (जी रक्कम कमी असेल) इतके अनुदान देण्यात येते. या अंतर्गत जमीन खरेदी, बांधकाम यासाठी अनुदान दिले जात नाही. प्रकल्प कार्यान्वीत झाल्यानंतर किमान ६ वर्षे सदर प्रकल्प यशस्वीपणे चालविणे बंधनकारक आहे.

दाल मिल/बेसन मिल, ऑईल मिल, पोहा मिल, राईस मिल, प्लोअर मिल, मसाला/लोणचे प्रक्रिया, हळद प्रक्रिया, केळी-बटाटा चिप्स, फळे पिकवण गृह (केळी, आंबा), फळे व भाजीपाला प्रक्रिया उद्योग, सोलर कोल्ड स्टोअरेज, पौल्ट्रीफीड मिल, बीज प्रक्रिया उद्योग, काजू प्रक्रिया उद्योग, सोया प्रक्रिया उद्योग, नागली प्रक्रिया उद्योग, फळे-भाजीपाला निर्जलीकरण प्रकल्प, अन्य नाविण्यपूर्ण व शेती व्यवसायाशी संबंधीत उद्योग/व्यवसाय अर्थसहाय्यासाठी पात्र आहेत.

अन्नधान्य व फळे-भाजीपाला या पिकांच्या कच्च्या मालावर प्राथमिक प्रक्रिया करुन गुणात्मक वाढ करण्याच्या दृष्टीने नविन व सुधारित तंत्रज्ञानाचा समावेश असणारे नाविण्यपूर्ण प्रकल्पच सहाय्यासाठी पात्र राहातील. उत्पादनाच्या ब्रँन्डसंबंधीची कागदपत्रे, प्रशिक्षण प्रमाणपत्र, प्रकल्प आराखडा (प्रोजेक्ट रिपोर्ट) इ. जोडणेआवश्यक आहे. तसेच प्रकल्पासोबत नोंदणी प्रमाणपत्र, लेखा परिक्षण अहवालाच्या प्रति व अन्य आवश्यक कागदपत्रे, बांधकाम नकाशा व अंदाजपत्रक जोडणे आवश्यक आहे.

उद्योग-व्यवसायासाठीची जागा भाडेपट्ट्याने घेतली असल्यास किमान २० वर्षे कालावधीसाठी घ्यावी. जागेबाबतचा मालकी हक्क पुरावा (७-१२, ८अ उतारे) किंवा नोटराईज्ड भाडेपट्टी करारनामा/लिज डीड पुरावा द्यावा.

### ६) शेळीपालन प्रात्यक्षिके व महिला ग्राम संपर्क कार्यकर्ती

अन्य उपक्रमांबरोबरच शेळीपालन प्रात्यक्षिके व महिला ग्राम संपर्क कार्यकर्ती हे दोन महत्वाचे उपक्रम प्रकल्पांतर्गत राबविले जातात. शेतीमध्ये नगदी पिकाचे उत्पादन घेतल्यास शेती व्यवसायचे मुल्यवर्धन होते, तद्वतच एक हेक्टर शेतीमध्ये संकरीत नेपीयर गवत व लसूण घासाची लागवड केल्यास प्रतीवर्षी १०० मे. टन. हिरव्या चा-यांचे उत्पादन मिळते. हा चारा १०० शेळयांना वर्षभर उपलब्ध होतो. या चा-यावर जोपासलेल्या १०० शेळ्यापासून जन्मणाऱ्या करडांची विक्री केल्यास प्रतिवर्षी मिळणारी रक्कम ही नगदी पिकाच्या किंमती इतकी किंबहुना त्यापेक्षा जास्त मिळू शकते.

प्रकल्पांतर्गत ही संकल्पना यवतमाळ जिल्ह्यात राबविली असून बीड व सातारा जिल्ह्यात त्याच धर्तीवर राबविली जात आहे. यवतमाळ जिल्ह्यात २५० प्रात्यक्षिके स्थापित केली असून बीड व सातारा जिल्ह्यात प्रत्येकी ७५० प्रात्यक्षिके स्थापन केली जात आहेत. जे शेतकरी शेळीपालन व्यवसाय छोट्या प्रमाणात करतात व ज्यांच्याकडे किमान १ एकर जमीन उपलब्ध आहे व चारापिके घेण्याची तयारी आहे अशा शेतकऱ्यांची निवड या उपक्रमाअंतर्गत केली जाते.

या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीच्या दृष्टीने सेवा पुरवठादार संस्थेची मदत प्रात्यक्षिकांची उभारणी व अन्य अनुषंगिक कामासाठी घेतले जाते. तसेच जिल्हा स्तरावरील पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालय व आत्मा च्या संयुक्त सहकार्यातून या उपक्रमाची अंमलबजावणी केली जाते. निवडलेल्या शेतकऱ्यांना तीन दिवसाचे शेळीपालनावर आधारित सखोल प्रशिक्षण, प्रत्येकी पैदासक्षम उस्मानाबादी बोकडाचे वाटप, चारापिकासाठी अनुदानावर बियाणे वाटप केले जाते. तसेच निवडक शेतकऱ्यांना चारा कटाई यंत्र, सायलेज बॅगा इ. साहित्य देखील अनुदानावर दिले जाते.

निवडलेल्या शेतकऱ्यांमध्ये व्यापक प्रसिध्दी होवून जिवंत वजनावर शेळ्या-मेंढ्यांची विक्री करण्यावर भर दिला जात असून नजिकच्या जनावरांच्या बाजारांमध्ये सामुदायिक पध्दतीने विक्री केल्यामुळे १०% ते २०% अधिक नाफा मिळण्यास मदत झाली आहे. शेतकऱ्यांच्या प्रात्यक्षिकांतून नफा होत असल्याचे ध्यानात आल्याने अनेक युवकांचा या व्यवसायाकडे कल वाढला आहे ही एक सकारात्मक बाब आहे.

राज्यातील निवडक जिल्ह्यांमध्ये महिला ग्रामसंपर्क कार्यकर्तीची निवड केली असून त्यांना तीन टप्यात १५ दिवसांचे पशुसंवर्धनविषयक सखोल प्रशिक्षण देण्यात आले आहे. एकंदर ६६० कार्यकर्तींची निवड केली

असून त्या पशुसंवर्धन विभाग व पशुपालक यांच्यातील गावस्तरावरील दुवा म्हणून काम करीत आहेत. या कार्यकर्त्या स्वेच्छा कार्यकर्त्या म्हणून काम करीत असून त्यांनी दिलेल्या सेवांचा मोबदला लाभ घेणाऱ्या पशुपालकांनी द्यावा अशी अपेक्षा असून काही कार्यकर्त्या प्रभावीपणे काम करीत असल्याचे दिसून आले आहे.

## ७) प्रकल्प व्यवस्थापन यंत्रणा

व्यापक स्वरुपाचे व सर्व राज्यामध्ये विकासात्मक प्रकल्प राबवित असतांना पर्यावरणाची हानी होणार नाही, समाजातील महिला, आदिवासी व मागास जाती-जमातींचा समावेश होवून त्यांना प्रत्यक्ष लाभ मिळावा, तसेच प्रकल्पाची अंमलबजावणी निर्धारित वेळेत व प्रभावीरित्या व्हावी यादृष्टीने पर्यावरण व सामाजिक व्यवस्थापन विभाग, संनियंत्रण व मुल्यमापन आणि माहिती व्यवस्थापन विभाग, संपादन विभाग, लेखा विभाग कार्यरत आहेत. या विभागांतर्गत त्या त्या विषयातील तज्ञ अधिकाऱ्यांची नेमणूक केली असून हे सर्व विभाग सक्षमपणे काम करीत आहेत.

प्रकल्पाची अंमलबजावणी करीत असतांना पर्यावरणाला हानी पोहचणार नाही, किंबहूना प्रकल्पातील कामामधून पर्यावरण संवर्धन करावे, पर्यावरण पूरक साहित्याचा वापर व्हावा यादृष्टीने ज्या उपाययोजना सुचविल्या आहेत, त्यानुसार कार्यवाही आहे. तसेच प्रकल्पातील सर्व उपक्रमांतून महिला, आदिवासी व मागास जाती-जमाती यांचा सहभाग होवून प्रकल्पाचा त्यांना प्रत्यक्ष लाभ मिळावा यादृष्टीने विविध कार्यशाळा, सेवा पुरवठादार संस्थांची क्षमता बांधणी व क्षेत्रीय भेटीतून प्रत्यक्ष मार्गदर्शन केले जाते.

## ८) शेती व शेतीपूरक व्यवसाय वाढीसाठी यंत्रणांची निर्मिती

प्रकल्पांतर्गत कृषि व्यवसाय प्रोत्साहन सुविधा व भारतीय कृषि विपणन माहिती व विश्लेषण सेवा यंत्रणा स्थापन केल्या आहेत. या यंत्रणांचा उद्देश राज्यात कृषि व कृषिपूरक व्यवसाय वाढीस लागावेत व शेतकऱ्यांना शेती व शेतमाल विक्रीशी संबंधित माहिती उपलब्ध करुन द्यावी हा आहे.

कृषि व्यवसाय प्रोत्साहन सुविधा या यंत्रणा ही शेतकऱ्यांचे उत्पन्नात वाढ व्हावी, शेती व शेतीपूरक व्यवसाय वाढावेत, त्यांना वित्तीय सवलती प्राप्त व्हाव्यात, शेतकरी उत्पादक कंपन्यांचा व्यवसाय वाढावा यादृष्टीने काम करीत आहे.

तसेच भारतीय कृषि विपणन माहिती व विश्लेषण सेवा यंत्रणेच्या वतीने शेतकऱ्यांना निवडक शेतमालाचा लागवडपूर्व, लागवड पश्चात व काढणी पश्चात बाजारभाव उपलब्ध करुन शेतमालाच्या विक्रीमुल्यामध्ये वाढ व्हावी यादृष्टीने प्रयत्नशील आहे. तसेच शेतकरी, वित्तिय संस्था, शेतमाल उत्पादन व विपणन क्षेत्रातील संस्था, संलग्न शासन विभागातील अधिकारी इ. घटकांसाठी शेतमाल किंमती व विपणन संबंधी कार्यशाळा, चर्चासत्रे इ. कार्यक्रमांचे आयोजन करुन जागृती केली जात आहे. या यंत्रणेमुळे कोणत्या शेतमालाचे उत्पादन घ्यावे, किती प्रमाणात घ्यावे, विक्री कोठे करावी व शेतमालाच्या संभाव्य किंमती याबाबतची माहिती उपलब्ध झाल्याने शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होत आहे.

## २) आशियाई विकास बँक (ADB) सहाय्यीत "कृषि व्यापारविषयक पायाभूत सुविधा विकास गुंतवणूक कार्यक्रम" (AIDIP)

**जपान फंड फॉर पॉवर्टी रिडक्शन अर्थसहाय्यीत लहान शेतक-यांना बाजारपेठेशी जोडण्याचा कार्यक्रम प्रकल्पाची संक्षिप्त माहिती**

या प्रकल्पासाठी आशियाई विकास बँकेने 'गरीबी निर्मुलनासाठी जपानचा निधी' मधुन १०० टक्के अनुदान स्वरूपात १.८८ मिलियन डॉलर एवढे अर्थसहाय्य उपलब्ध करुन दिलेले आहे. महाराष्ट्र शासनाच्या वतीने महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ हा प्रकल्प राबवत आहे. हा प्रकल्प एप्रिल २०१२ मध्ये सुरु झाला असुन ३१ डिसेंबर २०१८ पर्यंत आहे. प्रकल्पाचे कामकाज समाधानकारक असल्याने आशियाई विकास बँकेने तीन वेळा मुदतवाढ दिलेली आहे.

**प्रकल्पाचे उद्दीष्ट** - राज्यातील लहान फळे व भाजीपाला उत्पादक शेतक-यांना शेतमाल विक्रीचे अधिकाधिक पर्याय उपलब्ध करुन देऊन त्यांच्या उत्पन्नात वाढ करणे हे या प्रकल्पाचे महत्वाचे उद्दीष्ट आहे. त्यासाठी खालील उद्देश विचारात घेऊन प्रकल्पाची आखणी करण्यात आलेली आहे.

- फळे व भाजीपाला उत्पादक शेतक-यांचे उत्पादक गट आणि उत्पादक कंपन्या स्थापन करुन त्यांना एकात्मिक मुल्य साखळीशी जोडणे.
- पीक उत्पादन, काढणी पश्चात हाताळणी, मुल्यवृध्दी, विक्री व्यवस्था इ. बाबी संघटित पध्दतीने हाताळण्याचे प्रशिक्षण.

**कार्यक्षेत्र व प्रमुख पिके** –
महाराष्ट्रातील आठ जिल्ह्यांमध्ये एकुण चौदा ठिकाणी हा प्रकल्प राबविण्यात येत आहे.

| **जिल्हा** | **ठिकाण** | **प्रमुख पिके** |
|---|---|---|
| अहमदनगर | संगमनेर | टोमॅटो, डाळींब |
| नाशिक | सिन्नर, देवळा, चांदवड | कांदा, द्राक्षे, भाजीपाला |
| जळगाव | अंतुर्ली (ता. मुक्ताईनगर), पाडळसे (ता. यावल), गलंगी (ता. चोपडा), कजगाव (ता. भडगाव) | केळी, कांदा, भाजीपाला |
| औरंगाबाद | पाचोड (ता. पैठण) | मोसंबी |
| जालना | जालना | मोसंबी |
| बुलढाणा | संग्रामपुर | केळी, संत्रा |
| अकोला | बाळापुर | लिंबु, भाजीपाला |
| अमरावती | अंजनगाव सुर्जी, वरुड | संत्रा |

**प्रकल्पाचे स्वरुप** - प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात विशिष्ट पीक घेणा-या २२४१७ शेतक-यांचे १४०४ गट स्थापन करण्यात आले आहेत. या गटांच्या प्रशिक्षण गरजांचा अभ्यास करून त्यानुसार शेतक-यांच्या गटप्रमुखांचे प्रशिक्षण, तज्ञ कार्यशाळा, जागृती कँप, गावपातळीवर सभा, शेतकरी-खरेदीदार चर्चासत्र, मेळावा व प्रदर्शने इ. विविध प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात आले असुन या गटातील शेतक-यांच्या एकूण १८ शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापना करण्यात आल्या आहेत.

प्रकल्पाच्या दुस-या टप्प्यामध्ये प्रामुख्याने १८ उत्पादक कंपन्यांचे सभासदत्व वाढवून जास्तीत जास्त गटांना त्यांच्याशी जोडणे, या उत्पादक कंपन्यांचे व्यवसाय आराखडा (बिझीनेस प्लॅन) अद्ययावत करणे व त्याची अंमलबजावणी करणे व संबंधीत घटकांच्या क्षमता विकासासाठी प्रशिक्षण व प्रक्षेत्र भेटी, शेतकरी उत्पादक

कंपन्यांसाठी प्राथमिक प्रक्रीयांसाठी पायाभूत सुविधांची उभारणी, देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेशी जोडण्यासाठी सहाय्य हे महत्वाचे घटक आहेत.

उत्पादक कंपन्यांना आवश्यक खेळत्या भांडवलाची पुर्तता करण्यासाठी रु. २.२९ कोटी रकमेचा 'फिरता निधी' (रिव्हॉल्विंग फंड) स्थापन करण्यात आलेला आहे. या निधीतुन कंपन्यांना आवश्यक खेळते भांडवल बिनव्याजी दिले जाते. प्रकल्प कालावधी संपल्यावर हा निधी महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाकडे वर्ग करण्यात येणार आहे.

**२०१७-२०१८ मध्ये झालेले काम –**

- जेएफपीआर प्रकल्पाअंतर्गत स्थापन झालेल्या १८ शेतकरी उत्पादक कंपन्यांची एकूण शेतकरी सभासद संख्या ५३४३ एवढी असून जमा भागभांडवल रू. १२५.६८ लाख आहे.
- शेतकरी उत्पादक कंपन्यांनी देशांतर्गत विविध बाजारपेठांमध्ये आतापर्यंत एकूण ५७८७ मे. टन शेतमालाची विक्री केलेली आहे.
- १५ कंपन्यांकडून प्रत्येकी रु.२०.०० लाख खर्चाच्या प्राथमिक सुविधा केंद्राची उभारणी करण्यात येत असून प्रकल्पामार्फत कमाल रू. २०.०० लाखाच्या ७५ टक्के प्रमाणे रू. १५.०० लाख एवढी रक्कम अनुदान म्हणून देण्यात येणार आहे. मार्च २०१८ अखेर १५ पैकी ११ कंपन्यांना एकूण रू. ९७.०० लाख एवढ्या निधीचे वितरण करण्यात आलेले आहे.
- सदर प्राथमिक सुविधा केंद्रांमार्फत सभासदांच्या शेतमालाचे एकत्रीकरण, स्वच्छता, प्रतवारी, पॅकिंग, साठवणूक तसेच वाहतूक व विक्री करण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. या केंद्रांच्या माध्यमातुन शेतक-यांचा शेतमाल कंपन्यांमार्फत आठवडी बाजारात थेट विक्री, दिल्ली, कोलकाता इ. मोठ्या बाजारांमध्ये विक्री तसेच निर्यातीसाठी पाठविला जाईल.
- उत्पादक कंपन्यांना आवश्यक खेळत्या भांडवलाची पुर्तता करण्यासाठी ११ कंपन्यांना एकूण रू. ६७.०० लाख एवढा बिनव्याजी फिरता निधी वितरित करण्यात आलेला आहे.

***